सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३११ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १६ जानेवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# अमरावती महापालिकेत खिचडी
# महापौर कुणाचा ?
## आज पासून राजकीय पक्षांचे पुन्हा बैठकांचे सत्र सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

अमरावती महानगर पालिकेची मतमोजणी आज स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स या ठिकाणी पार पडली मात्र या निवडणुकीत कोणत्या राजकीय पक्षाला बहुमत न मिळाल्याने महापौर कुणाचा होणार? कोणता राजकीय पक्ष सत्तेची गणिते जुळवून महापौर बसविणार या कडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



आज सकाळी १० वाजल्या पासून मतमोजणीला सुरुवात झाली. सत्तेची प्रचंड अपेक्षा बाळगून असेलल्या भाजपाला बहुमताचा आकडा स्वबळाबर पार करता आला नाही त्यानंतर काँग्रेस पक्षाची हि तेच स्थिती झाली त्यांनाही बहुमताच्या आकड्या पर्यंत पोहचता आले नाही तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट यांनी सर्वाधित सर्वच प्रभागात आपले उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरविले होते मात्र त्यानांही अपेक्षा प्रमाणे यश मिळू शकले नाही. त्यामुळे आता सत्ते स्थापने साठी कोणता पक्ष कोणाचा आधार घेऊन आपली सत्ता स्थापन करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अमरावती महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी ४४ जागांची गरज आहे. हा आकडा कोण गाठणार याकडे सर्वांचं लक्ष आहे. अमरावती महापालिका निवडणुकीत काही पक्ष स्वतंत्र तर काही पक्ष आघाडी करुन निवडणूक लढले. अमरावतीत राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, एकनाथ शिंदेंची शिवसेना, बसपा, युवा स्वाभिमान पार्टी यांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढवली. तर, वंचित बहुजन आघाडी आणि युनायटेड फोरम यांनी आघाडी करत निवडणूक लढवली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टी आणि समाजवादी पक्षानं आघाडी करुन काही जागा लढवल्या. तर काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती लढवल्या गेल्या होत्या. पाच वाजेपर्यत अमरावती महानगर पलिकेत खालील प्रमाणे राजकीय पक्षांचे उमेदवार निवडून आले होते.

| | |
|---|---|
| भाजप | २२ |
| काँग्रेस | १६ |
| राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट | १७ |
| शिवसेना शिंदे गट | ३ |
| शिवसेना ऊबाठा | २ |
| एम् आय एम् | १३ |
| युवा स्वाभिमान | १० |
| बहुजन समाज पार्टी | ३ |

# मुंबईत भाजपचीच लाट, शिंदेंचीही बाजी
## उद्धव ठाकरे यांना महायुतीने दिला मोठा झटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ मुंबई**



संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या मुंबई महानगर पालिका निवडणुकीचा निकाल हाती आला आहे. मुंबई महानगर पालिकेमध्ये महायुतीचा विजय झाला. महायुतीने ठाकरे बंधूंना जोरदार झटका दिला. मुंबईमध्ये भाजपचे सर्वात जास्त उमेदवार विजयी झाले आहेत. अद्याप काही जागांचा निकाल येणं बाकी आहे. काही जागांचे चित्र स्पष्ट झाले आहे. आतापर्यंत आलेल्या कलानुसार, महायुती १२५ जागांवर आघाडीवर आहे. यामध्ये भाजप ९५ आणि शिवसेना शिंदे गट ३० जागांवर आघाडीवर आहे. तर ठाकरे बंधूंची युती ७५ जागांवर आघाडीवर आहे. ठाकरेंची शिवसेना ६६ आणि मनसे ९ जागांवर आघाडीवर आहे. स्वबळावर निवडणूक लढवलेला काँग्रेस पक्ष १५ जागांवर आघाडीवर आहे. तर राष्ट्रवादी एका आणि इतर ११ जागांवर आघाडीवर आहेत.

मुंबई महानगर पालिकेच्या २२७ जागांसाठी ५२.९४ टक्के मतदान झालं. मुंबईमध्ये सत्ता स्थापन करण्यासाठी ११४ जागांची आवश्यकता आहे. ही मॅजिक फिगर महायुतीने गाठले आहे. महायुतीमध्ये भाजपचे सर्वात जास्त उमेदवार जिंकले आहेत. त्यामुळे मुंबई महानगर पालिकेवर भाजपचाच महापौर होण्याची शक्यता आहे. आणखी काही तासांच संपूर्ण चित्र स्पष्ट होईल.

# राज्यात AIMIM ची जोरदार मुसंडी, ९५ नगरसेवक विजयी
## अमरावती मध्ये हि विजयी घौडदौड सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**



राज्यातील २९ महापालिका निवडणुकीचा निकाल आता समोर आला आहे. या महापालिकांमध्ये भारतीय जनता पार्टीने जबरदस्त कामगिरी केली आहे. मात्र या निकालांमध्ये असदुद्दीन औवेसी यांच्या एमआयएमच्या यशाने अनेकांचे लक्ष वेधून घेतले. राज्यातील महापालिकांच्या निकालांमध्ये ९५ हून अधिक एमआयएमचे नगरसेवक निवडून आले आहेत. त्यात मुंबईत ४ जागांवर एमआयएमचे उमेदवार विजयी झाले आहेत. त्यात मानखुर्द-गोवंडी या भागात एमआयएमने समाजवादी पक्षाला मोठा धक्का दिला. त्यामुळे मुंबईत काँग्रेससह सपासाठी हा मोठा धक्का मानला जातो. मुंबईतील मुस्लीम लोकसंख्या असलेल्या भागात औवेसी यांची जादू चालल्याचे दिसून येते.

सोलापूर, धुळे, नांदेड,अमरावती या महापालिकांमध्ये एमआयएमचे प्रत्येकी ८ असे २४ नगरसेवक निवडून आले आहेत. अमरावती महापालिकेत ६, ठाण्यात ५, नागपूरात ४ ठिकाणी एमआयएमचे नगरसेवक निवडून आले आहेत. राज्यातील २९ पैकी १३ महापालिकांत एमआयएमचे ९५ नगरसेवक विजयी झाले आहेत. छत्रपती संभाजीनगर महापालिकेत एमआयएमचे सर्वाधिक २४ नगरसेवक निवडून आले आहेत. मालेगाव महापालिकेत एमआयएमचे २० नगरसेवक निवडून आले आहेत. मुंबईतही एमआयएमच्या विजयाचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यात समाजवादी पक्षाला मागे सारत एमआयएमची सरशी झाली आहे. जोरदार मुसंडी, ९५ नगरसेवक विजयी झाले आहेत अमरावती महानगरपालिएकट वृत्त लिहेस्तर १०नगरसेवक हे निवडून आले होते हे विशेष.

# दानवे फॅक्टर! जालन्यात भाजपची एकहाती सत्ता
# ६५ पैकी ४१ जागांवर दणदणीत विजय



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६जालना**

प्रथमच होत असलेल्या जालना महानगरपालिका निवडणुकीतील मतमोजणी शुक्रवारी सकाळी १० वाजता सुरू झाली. मतमोजणीत दुपारी २ वाजेपर्यंत भाजपच्या २५ उमेदवारांचा विजय निश्चित झाला होता. तर, सायंकाळपर्यंत हाती आलेल्या आकडेवारीनुसार, भाजपने ४१ जागांवर दणदणीत विजय मिळवत, एकहाती सत्ता मिळवली आहे.

जालना महानगरपालिकेच्या १६ प्रभागातील ६५ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. या प्रक्रियेत गुरूवारी ६१.१६ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. तर शुक्रवारी निवडणूक निर्णयाधिकारी तथा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणीस प्रारंभ झाला.

पाच झोननुसार सहा टेबलांवर करण्यात आलेल्या मतमोजणीत प्रारंभीपासूनच भाजपने आघाडी घेतली होती. दुपारी २ वाजेपर्यंत भाजपच्या २५ उमेदवारांनी गुलाल उधळला होता. दिवसा अखेर भाजपने ४१, शिवसेना १२, कांग्रेस ९, एमआयएम २, तर एका अपक्षाने बाजी मारली आहे.

### युती तुटल्याने बदलली राजकीय समीकरणे

निवडणुकीपूर्वी भाजप आणि शिंदे गटातील शिवसेना यांच्यात युती होण्याबाबत चर्चा सुरू होती. मात्र या बैठका निष्फळ ठरल्या आणि अखेर जालना महानगरपालिकेत भाजप-शिवसेना (शिंदे गट) यांची युती तुटल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे दोन्ही पक्षांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढवली.

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि मनसे यांची युती पाहायला मिळाली. महाविकास आघाडीतील घटक पक्षही स्वतंत्रपणे मैदानात उतरल्याने प्रत्येक प्रभागात चुरशीची लढत झाली. याशिवाय अनेक अपक्ष उमेदवारांनीही दिग्गज उमेदवारांना कडवी टक्कर दिली.

# सोलापुरात काँग्रेसचा सुफडा साफ; खासदार प्रणिती शिंदेंच्या प्रभागात भाजपचा दणदणीत विजय


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६सोलापूर**



सोलापूर महानगरपालिका निवडणूक निकालात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांचे निवासस्थान असलेल्या प्रभाग क्रमांक २३ मध्ये भाजपने महाविकास आघाडीचा सुफडा साफ करत मोठा विजय मिळवला आहे. या प्रभागात भाजपच्या पॅनलने भरघोस मतांनी विजय संपादन मिळवला आहे. राजकीय वर्तुळात या निकालाची जोरदार चर्चा सुरू आहे. खासदार प्रणिती शिंदे यांचे जुने घर 'जाई-जुई' हे सोलापूर-विजापूर महामार्गावर असून, ते याच प्रभागात येते. त्यामुळे हा प्रभाग काँग्रेससाठी प्रतिष्ठेचा मानला जात होता. या प्रभागात महाविकास आघाडी आणि भाजप यांच्यात चुरशीची लढत पाहायला मिळाली.

महाविकास आघाडीच्या वतीने दीपाली शहा (काँग्रेस), अलका राठोड (उबाठा), लक्ष्मण जाधव (उबाठा) आणि सुनीता रोटे (राशप) हे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. मात्र मतमोजणीअंती भाजपच्या पॅनलने सर्व उमेदवारांचा पराभव करत एकतर्फी विजय मिळवला. खासदार प्रणिती शिंदे राहत असलेल्या प्रभागातच भाजपचा असा मोठा विजय झाल्याने काँग्रेस आणि महाविकास आघाडीला हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. या निकालामुळे आगामी राजकीय समीकरणांवरही परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# भावाशी युती करूनही राज ठाकरेंच्या खात्यात २२ शून्य
## मुंबईत 'मनसे'ला जबरदस्त धक्का; ठाकरे ब्रँड फेल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६मुंबई**

मुंबई महानगरपालिकेच्या सत्तेसाठी २० वर्षांचा वनवास संपवून एकत्र आलेल्या 'ठाकरे बंधू'साठी आजचा निकाल धक्कादायक ठरताना दिसत आहे. मतमोजणीच्या ताज्या कलानुसार, शिवसेना (उबाठा) आणि मनसेच्या युतीला मुंबईकरांनी नाकारल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. एकीकडे भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या महायुतीने बहुमताच्या दिशेने वेगाने वाटचाल केली असताना, दुसरीकडे राज ठाकरे यांची मनसे केवळ काही मोजक्याच जागांवर अडकली आहे. विशेष म्हणजे चुलत भाऊ उद्धव ठाकरे यांच्यासोबत युती करूनही राज ठाकरे यांना मुंबईत आपली छाप पाडता आलेली नाहीमराठी माणसाच्या मुद्द्यावर राजकारण करणाऱ्या राज ठाकरे यांच्या मनसेचे या निवडणुकीत अक्षरशः पानिपत झाले आहे. राज ठाकरे यांनी यंदा उद्धव ठाकरे यांच्याशी हातमिळवणी करत मुंबईत 'मराठी कार्ड' खेळण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, सुरुवातीच्या निकालानुसार मनसेला केवळ ५ जागांवर समाधान मानावं लागत असल्याचं दिसत आहे. २०१७ च्या निवडणुकीत मनसेचे ७ नगरसेवक निवडून आले होते, यंदा युती करूनही ही संख्या वाढताना दिसत नाहीये. राज ठाकरे यांची सभा आणि संवाद यांचा प्रभाव मतपेटीतून उमटला नसल्याचे चित्र आहे.

राज ठाकरे यांच्या पक्षाला अनेक महत्त्वाच्या शहरांमध्ये खातेही उघडता आलेले नाही. पुण्यात १६५ जागांपैकी १२२ जागांचे कल हाती आले असून तिथे मनसेला एकही जागा मिळालेली नाही. ठाणे, नवी मुंबई आणि उल्हासनगरमध्ये मनसेला प्रत्येकी केवळ १ जागा मिळाली आहे. नाशिकमध्ये २ तर अहिल्यानगरमध्ये ३ उमेदवार आघाडीवर आहेत. कल्याण डोंबिवलीत १२२ जागांपैकी मनसेला केवळ ४ जागांवर आघाडी मिळवता आली आहे. याशिवाय नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर आणि सोलापूर,सह एकूण २२ शहरांमध्ये मनसेचा पूर्णपणे सफाया झाला आहे.

# मुंबईत महायुतीला बहुमत आठवलेंनी केला मुख्यमंत्री फडणवीस यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६मुंबई**



अत्यंत प्रतिष्ठेची निवडणुक ठरलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजप शिवसेना रिपाइं महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्याबद्दल रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज वर्षा बंगल्यावर भेट घेवून हार्दिक अभिनंदन केले. राज्यातील २९ महापालिकांपैकी २६ महापालीकांमध्ये महायुतीला बहुमत मिळाल्याबद्दल ना.रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले आहे. महाराष्ट्रात सर्व महापालिकांमध्ये महायुतीच्या महाविजयाचे शिल्पकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ठरल्याचे सांगत ना. रामदास आठवले यांनी मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले आहे.

मुंबई महापालिकेची निवडणुक ठाकरे बंधूंनी प्रतिष्ठेची निवडणुक केली होती. गेली २५ वर्ष उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे मुंबई महापालीकेवर राज्य होते. मराठी भाषेचा भावनिक मुद्दा उपस्थित करुन उध्दव आणि राज या दोन बंधुनी मुंबई पालिकेची निवडणुक चुरशीची केली होती. या निवडणुकीच्या निकालाबाबत आपण आधीच सांगितले होते की, मुंबईत मराठी जनता ही भावनिक राजकारणाला भुलणार नाही. विकासाच्या मुद्दयांना मराठी जनता महत्व देईल. मराठी भाषिक जनतेने आणि मुंबईतील गैरमराठी जनतेने महायुतीला भरभरुन मतदान केले आहे. त्यामुळे महायुतीचा महाविजय झालेला आहे. उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेना अनेक वर्ष मुंबई महापालिकेवर राज्य करु शकली ते केवळ भाजपच्या पाठिंब्यामुळे!२०१२ सालापासुन रिपब्लिकन पक्षाने शिवसेनेला शिवशक्ती -भिमशक्तीच्या माध्यमातुन पाठिंबा दिला होता. मात्र आता भाजप रिपाइं ठाकरे सेने सोबत नसल्यामुळे शिवसेनेचा दारुण पराभव झालेला आहे. राज ठाकरे यांच्या युतीमुळे उध्दव ठाकरेंचा फायदा होणार नाही; हे मी या आधीच सांगितले होते असे ना. रामदास आठवले म्हणाले.

राज्यातील २९ महापालिकांपैकी २६ महापालिकेत महायुतीचा महाविजय होणार असल्याचा आपला अंदाज खरा ठरला असल्याचे ना.रामदास आठवले म्हणाले.

## संपादकीय ......

# ट्रम्प यशस्वी होणार की फुसका बार?

अमेरिकेने टॅरिफ लादूनही ऑक्टोबरपासून भारतीय निर्यातीचा आलेख वाढतच चालला आहे; तर चीनच्या व्यापारात १ लाख २० हजार कोटी डॉलर्सची सरप्लस झाली आहे. चिमुकला ग्रीनलँडही महासत्तेला आव्हान देत आहे.अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या उन्मादी महत्त्वाकांक्षेला धुमारे फुटल्यामुळे सध्या जग तिसर्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपले आहे. व्हेनेझुएलावर कारवाई केल्यानंतर ग्रीनलँडवर कब्जा करण्याच्या हालचाली ट्रम्प यांनी सुरू केल्या आणि पाठोपाठ आता इराणमधील उफाळून आलेल्या जनआक्रोशाचे निमित्त साधून इराण आणि त्या देशाबरोबर व्यापार करणार्या इतर देशांची अमेरिका कोंडी करू पाहते आहे. या पार्श्वभूमीवर रशियाने अण्वस्त्र हल्ल्याची तयारी सुरू केली आहे, असे समजते. चीनने आपल्यावर अमेरिकेने अण्वस्त्र हल्ल्याचे पहिले बटण दाबल्यास त्याचे प्रत्युत्तर म्हणून चीनचे दुसरे बटण अमेरिकेला बेचिराख करेल, अशी धमकी दिली आहे. सोबत उत्तर कोरिया अण्वस्त्रांच्या चाचण्या घेऊन मध्य पूर्वेत तणाव निर्माण करतो आहे. जागतिक व्यापारासाठी अमेरिकेचा चाललेला हा खटाटोप यशस्वी ठरतो की फुसका बार, याचे उत्तर नजीकच्या काळात मिळेल. परंतु, एकूणच जग चिंता आणि दहशतीच्या खाईत लोटले जाते आहे आणि त्याचे श्रेय शांतिदूताचा बुरखा पांघरून अतिमहत्त्वाकांक्षेने पछाडलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडे जाते आहे.

जगातील गेल्या ९ महिन्यांतील घडामोडींकडे लक्ष दिले, तर याचा उलगडा होऊ शकतो. अमेरिकेने रशियन ऑईल खरेदीच्या मुद्द्यावरून एक ऑगस्ट २०२५ रोजी भारतावर २५ टक्क्यांचे टॅरिफ लावले. यानंतर दबाव तंत्राचा भाग म्हणून २७ ऑगस्ट रोजी ५० टक्के टॅरिफची अंमलबजावणी सुरू केली आणि भारत त्यालाही जुमानत नाही, असे लक्षात येताच ५०० टक्क्यांचे टॅरिफ लावून भारताची व्यापारी कोंडी करण्याची अमेरिकेने तयारी केली. तथापि, ज्या रशियाचा व्यापार तोडण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प हा सारा उद्योग करीत होते, त्या रशियाकडून अमेरिकेची नैसर्गिक वायूची आयात मात्र बिनदिक्कत सुरू होती. रशियन ऑईलच्या ग्राहकांमध्ये चीन पहिल्या स्थानावर आहे. परंतु, जेवढी कोंडी भारताची करण्याचा प्रयत्न अमेरिकेने केला, तेवढी चीनची कोंडी करण्याचे धाडस मात्र अमेरिकेने दाखविले नाही. ट्रम्प यांचे साम-ाज्यवादी धोरण हे 'अमेरिका फर्स्ट' या भूमिकेवर आधारित असल्याचे दिसून येते. आधीच महासत्ता असलेल्या अमेरिकेचे आर्थिक, लष्करी व राजकीय वर्चस्व टिकवणे हा त्यांच्या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. त्यातूनच व्यापार कर वाढवणे, निर्बंध लादणे आणि दबावाचे राजकारण याचा वापर ते मोठ्या प्रमाणात करताना दिसतात. इतकेच काय, पण नाटो व इतर आंतरराष्ट्रीय संस्थांकडे ट्रम्प हे नेहमीच व्यवहार्य फायद्याच्या दृष्टीने पाहात आले आहेत. तथापि, ट्रम्प यांच्या या धोरणामुळे जागतिक पातळीवर तणाव आणि विरोधही वाढला.

अमेरिकेचे जागतिक शांततेच्या नावाखाली सुरू असलेले हे उद्योग काही नवे नाहीत. यापूर्वी इराणच्या भूमीवरून इस्रायलला नेस्तनाबूत करण्यासाठी अमेरिका पुढे होती. यानंतर इस्रायल-हमास युद्धात इराण सहभागी होतो आहे, असे लक्षात येताच अमेरिकेने इस्रायलच्या बाजूने इराणवर क्षेपणास्त्रांचा हल्ला केला. रशिया-युक्रेन युद्धात आपण शांतिदूताची भूमिका घेतो आहे, असे भासवत अमेरिकेने हातात दंडुका घेऊन जगातील अनेक देशांवर टॅरिफ लावले. यानंतर अलीकडेच अमेरिकेतील अमली पदार्थांच्या तस्करीमध्ये अवघ्या एक टक्क्याचा सहभाग असल्याचा खुद्द अमेरिकेचा अहवाल सांगत असताना डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हेनेझुएलाच्या अध्यक्षांना सपत्निक अटक करून अमेरिकेत त्यांच्यावर खटला भरला आणि व्हेनेझुएलाची सूत्रे आपल्या हातात घेतली.

त्यानंतर ग्रीनलँड या शांततापूर्ण देशाचा ताबा किंमत मोजून घेण्याची सध्या अमेरिकेची तयारी सुरू आहे. त्यासाठी पुढचे पाऊल म्हणून अमेरिकन संसदेत तसे विधेयक सादर केले गेले आहे. ते विधेयक मंजूर झाल्यावर ग्रीनलँडबाबत काहीही कृती करण्याचा फ्री हँड ट्रम्प यांना मिळेल. हे सगळे सुरू असतानाच आता इराणमध्ये महागाईच्या मुद्द्यावरून उसळलेल्या आगडोंबात तेल टाकण्याचा प्रयत्न अमेरिका करते आहे. अमेरिकेचा हा व्यवहार इथवर थांबलेला नाही. त्यांनी इराणबरोबर व्यापार करणार्या देशांना टॅरिफ लावण्याची धमकी दिली आहे. यामुळे एकूणच जगात सर्वत्र अशांतता आहे. व्यापार विस्कळीत होतो आहे आणि त्याला शांतीदूत कारणीभूत ठरतो आहे. जागतिक पुरवठा साखळीवर याचे परिणाम होणार आहेत. काही परिणाम दीर्घकालीनही असू शकतात.

अमेरिकेच्या या कृतीचा जगावर नेमका काय परिणाम झाला? नव्या वर्षाची पहाट होण्यापूर्वी जागतिक व्यापाराची जी आकडेवारी समोर आली आहे, ती पाहता अमेरिकेच्या धमकीने घाबरून न जाता अनेक देशांनी नव्या बाजारपेठांचा शोध घेतला. अमेरिकेच्या या वर्चस्ववादी भूमिकेवर नाराज असलेल्या जगातील छोट्या-मोठ्या राष्ट्रांनी परस्परांमध्ये व्यापार करार करून अमेरिकेच्या कूटनीतीला उत्तर दिले. भारतावर १ ऑगस्ट २०२४ ते १ जानेवारी २०२६ या कालावधीत २५ ते ५०० टक्क्यांपर्यंत टॅरिफ आकारले गेले. परंतु, भारतीय निर्यातीचा आलेख पाहिल्यास त्याचे दोन भाग स्पष्ट दिसतात. प्रारंभीच्या काळात भारताची निर्यात मोठ्या प्रमाणात घसरली. व्यापारी तूट मोठ्या प्रमाणात वाढली. पण ऑक्टोबरनंतर पर्यायी बाजारपेठांमुळे भारताची निर्यात लक्षणीय वाढताना दिसते आहे. यामध्ये हिरे, जडजवाहिरे, औषधे, तयार कपडे या भारतीय उद्योगांना उभारी मिळू लागली आहे.

अमेरिकेने चीनवर टॅरिफ लागू केले होते. परंतु, चीनच्या व्यापाराची आकडेवारी नुकतीच समोर आली आहे. यामुळे २०२५ सालात चीनची निर्यात ६ टक्क्यांनी वाढून ती ४ लाख कोटी डॉलर्स या उच्चांकी पातळीवर गेली आहे.

# ढगाळ हवामानामुळे गहू पिकावर येवू शकतो 'हा' रोग; लक्षणे दिसताच त्वरित करा अशी फवारणी

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक**

गहू पिकावरील तांबेरा (गंज रोग) नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन कृषी विभागाच्यावतीने करण्यात येत आहे.

गहू पिकावर तांबेरा (गंज रोग) हा एक गंभीर बुरशीजन्य रोग असून, वेळेवर उपाययोजना न केल्यास उत्पादनात मोठी घट होऊ शकते.




या पार्श्वभूमीवर कृषी तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना खालील प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजना सुचविल्या आहेत.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**प्रतिकारक वाणांचा वापर**

गहू पिकावर तांबेरा रोग टाळण्यासाठी प्रतिकारक वाणांची निवड महत्त्वाची आहे.

'फुले समाधान', 'फुले अनुपम', 'कऊ २१८९', 'पुण्या', 'परभणी-५१', 'त्र्यंबक', 'गोदावरी', 'तपोवन' आणि 'शरद' हे वाण तांबेरा रोगास प्रतिकारक असल्याने त्यांचा वापर करावा.

**लक्षणे दिसताच फवारणी**

पानांवर नारंगी किंवा काळ्या रंगाचे ठिपके दिसू लागताच बुरशीनाशकांची फवारणी सुरू करावी.

तांबेरा रोगाची लक्षणे आढळताच त्वरित फवारणी करणे आवश्यक आहे.

यामध्ये टेबुकोनाझोल ५० टक्के ट्रायफ्लोक्सीस्ट्रोबिन २५ टक्के डब्ल्युजी हे बुरशीनाशक ६ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. गरज भासल्यास १५ दिवसांनी दुसरी फवारणी घ्यावी.

तसेच मॅन्कोझेब ७५ टक्के डब्ल्यूपी किंवा झिनेब ७५ टक्के डब्ल्युपी हे बुरशीनाशक ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करता येते.

याशिवाय प्रवायकोनाझोल २५ टक्के एसी (९० मिली), क्रेसॉसिम मिथाइल ४४.३ टक्के एससी (१० मिली) किंवा मॅन्कोझेब ७५ टक्के डब्ल्यूपी (३० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी) यापैकी कोणतेही एक बुरशीनाशक वापरण्याचा सल्ला दिला आहे.

रोगाचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन १० ते १५ दिवसांच्या अंतराने दुसरी फवारणी घ्यावी.

**इतर उपाययोजना**

रोगग्रस्त पाने त्वरित काढून नष्ट करावीत.

शेतीत पाण्याचा अतिवापर टाळून योग्य जलनियोजन ठेवावे.

तसेच पेरणीपूर्वी गांडूळ खत किंवा सेंद्रिय खतांचा वापर केल्यास पिकांची रोगप्रतिकारक क्षमता वाढते.

पाणी मर्यादित स्वरूपात आवश्यकतेनुसार द्यावे.

शेतात अतिरिक्त ओलावा राहणार नाही याची काळजी घ्यावी.

या उपाययोजना वेळेवर, योग्य मात्रेत आणि शास्त्रीय पद्धतीने केल्यास गहू पिकावरील तांबेरा (गंज) रोगाचे प्रभावी नियंत्रण करता येईल.

# झोपण्यापूर्वीचे मेंटल डिटॉक्स

**दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक**



आजच्या धावपळीच्या युगात आपले मन सतत नवनवीन माहिती, चिंता आणि अपेक्षांच्या ओझ्याखाली दबलेले असते. कामाचा ताण, मोबाईलचा अतिवापर, नात्यांमधील गुंतागुंत आणि भविष्याची काळजी यांमुळे मानसिक थकवा येणे स्वाभाविक आहे. ज्याप्रमाणे शरीराची स्वच्छता महत्त्वाची असते, त्याचप्रमाणे मनाला शांत आणि शुद्ध करणे म्हणजेच 'मेंटल डिटॉक्स' करणे आजच्या काळाची गरज बनली आहे.मानसिक शांततेसाठी कोणत्याही मोठ्या बदलाची गरज नसून दररोजच्या छोट्या सवयी पुरेशा आहेत. रात्री झोपण्यापूर्वी केलेले मानसिक डिटॉक्स केवळ झोपेचा दर्जा सुधारत नाही, तर दुसर्या दिवसासाठी मनाला सज्ज आणि संतुलित करते.




**स्वतःसाठी वेळ :** दिवसभरा च्या जबाबदार्यांमधून किमान पाच ते दहा मिनिटे फक्त स्वतःसाठी राखून ठेवा. या काळात मोबाईल, टीव्ही आणि सोशल मीडियाच्या नोटिफिकेशनपासून पूर्णपणे दूर राहा.दीर्घ श्वसनाचा सराव : डोळे बंद करून पाच ते सातवेळा दीर्घ श्वास घ्या. श्वास घेताना आपण शांतता अनुभवत आहोत आणि श्वास सोडताना सर्व ताण बाहेर टाकत आहोत, अशी भावना मनात ठेवा.

कृतज्ञता व्यक्त करा : दिवसभरात घडलेल्या चांगल्या गोष्टींची आठवण करा. कितीही छोटी गोष्ट असली तरी त्या अनुभवाबद्दल मनापासून आभार मानण्याची सवय लावा. प्रत्येक गोष्ट आपल्या नियंत्रणात नसते, हे वास्तव स्वीकारा. झोपण्यापूर्वी समस्यांवर विचार करण्याऐवजी त्या दुसर्या दिवसावर सोडून द्या आणि मनाला विश्रांती द्या.

**सकारात्मक विचारांचा अवलंब :** 'मी सुरक्षित आहे, मी शांत आहे' अशी सकारात्मक वाक्ये मनातल्या मनात उच्चारा. मन भरकटले तर पुन्हा लक्ष श्वासावर केंद्रित करा.

**सातत्य राखा :** मनाचे निर्विषीकरण ही केवळ एक दिवसाची प्रक्रिया नसून ती रोजची सवय बनवा. सातत्यपूर्ण सरावाने मन नैसर्गिकरीत्या शांत राहू लागते.यामुळे ताण आणि अस्वस्थता कमी होते, झोप उत्तम लागते, भावनिक संतुलन राखले जाते आणि निर्णय घेण्याची क्षमता सुधारते. जेव्हा आपण रात्री झोपण्यापूर्वी मन शांत करायला शिकतो, तेव्हा जीवनात आपोआप संतुलन येते.

# पस्तिशीनंतर तारुण्याला लागते उतरती कळा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ नवी दिल्ली :** शारीरिक तंदुरुस्ती आणि स्नायूंची ताकद ३५ वयापर्यंत सर्वोच्च पातळीवर पोहोचते, त्यानंतर हळूहळू कमी होऊ लागते. ही घसरण व्यायामाने थांबवता येत नाही, पण नक्की मंदावता येते. कधीही व्यायाम सुरू करणे उशिरा होत नाही, असे संशोधक सांगतात. स्वीडनच्या अभ्यासात यासंदर्भात खुलासा करण्यात आला आहे.



स्वीडनमधील कारोलिंस्का इन्स्टिट्यूटने एक संशोधन केले आहे. स्वीडिश फिजिकल ॲक्टिव्हिटी अँड फिटनेस स्टडी - डझअऋ असे त्याचे नाव आहे. ४७ वर्षांपासून शेकडो पुरुष आणि महिलांचे निरीक्षण करण्यात आले. हे लोक १६ ते ६३ वयाच्या होते आणि त्यांची शारीरिक क्षमता, ताकद आणि स्नायूंची टिकाऊपणा वारंवार तपासला गेला. हा अभ्यास विशेष आहे कारण यात एकाच लोकांचे दीर्घकाळ निरीक्षण करण्यात आले. जे आधीच्या अभ्यासांपेक्षा वेगळे आहे. शारीरिक तंदुरुस्ती, स्नायूंची ताकद आणि सहनशक्ती ही सर्वोच्च पातळी साधारण ३५ वर्षांपर्यंत पोहोचते. त्यानंतर हळूहळू कमी होऊ लागते. म्हणजे ३५ हे वय एक मोठ्या बदलाचा टप्पा आहे.

जिथून शरीराची कार्यक्षमता खालावायला सुरुवात होते, मग व्यायाम कितीही केला तरी हे होत असल्याचे अभ्यासातून समोर आले आहे. सुरुवातीला ही प्रक्रिया कमी होणे फार हळू म्हणजे वर्षाला फक्त ०.३ ते ०.६ टक्के होते. पण वय वाढत जाताच ही गती वेगवान होते आणि नंतर २.० ते २.५ टक्के प्रति वर्ष इतकी होऊ शकते. हे बदल पुरुष आणि महिला दोघांमध्येही दिसत असल्याचे अभ्यासात म्हटले आहे. व्यायाम सुरू केल्याने शारीरिक क्षमता ५ ते १० टक्के सुधारू शकते. व्यायामाने ही कमी होण्याची प्रक्रिया पूर्ण थांबवता येत नाही, पण नक्कीच मंदावता येते. व्यायाम कधीही उशिरा सुरू करू नका.

व्यायामाने शरीराच्या क्षमतेची घसरण थांबवता येत नाही, पण ती नक्की मंद करता येते, असे अभ्यासात म्हटले आहे. आता ३५ वे वर्ष का पीक वर्षे असते? याबद्दल संशोधक अभ्यास करत आहेत. वृद्धत्वाची प्रक्रिया वयाच्या पस्तिशीपासूनच सुरू होते पण सक्रिय जीवनशैलीने आपण तिला आव्हान देऊ शकतो. नियमित हालचाल आणि व्यायामाने निरोगी आयुष्य जास्त काळ टिकवता येते, असे संशोधन सांगते. हा अभ्यास 'जर्नल ऑफ कॅशेक्सिया, सार्कोपेनिया अँड मसल'मध्ये प्रसिद्ध झाला आहे..

# समोर आले निवडणुकीची शाई पुसण्याचे प्रकरण

## नितीन चेडुंलकर यांनी सोशल मीडियावर वायरल केला व्हिडिओ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ अमरावती** -महानगरपालिका निवडणुकीसाठी गुरुवारी मतदान प्रक्रिया पार पडली. प्रक्रियेदरम्यान मतदारांच्या हातावर लावण्यात आलेली शाई मिटल्याचे आरोप लावले जात होते. अशात काही नागरिकांनी आपले व्हिडिओ सोशल मीडियावर वायरल केले आहे. शहरातील सुप्रसिद्ध बिल्डर नितीन चेंडुलकर यांनी व्हिडिओ वायरल करत १० सेकंद मध्ये ही शाही मिटत असल्याचे सांगितले आहे. नितीन चेंडुलकर यांनी आपल्या व्हिडिओ मध्ये सांगितले आहे की, मतदान झाल्यावर बोटावर लावण्यात येणारे मार्कर पेनची शाही सॅनिटायझर आणि नेलपेंट रिमुव्हवर ने मिटत आहे. व्हिडिओमध्ये त्यांनी स्वतःच्या बोटावरील शाहीचे निशाण पुसून दाखवले आहे. रिमूव्हर तर सोडा पाण्याने पण ही शाही मिटत आहे. हे प्रक्रिया लोकशाहीच्या विरोधात असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. यामुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर मोठे प्रश्न उभे होत आहे.



# मतांचा घसरलेला टक्का नेमका कुणाला धक्का देणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ नागपुर-** महाराष्ट्र महानगरपालिका निवडणुकांमध्ये नागपूर शहरात कमी मतदान टक्केवारीची नोंद झाली असून, त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना वेग आला आहे. दहाही झोनमध्ये निवडणूक यंत्रणा पूर्णपणे सज्ज असली तरी मतदारांचा कमी प्रतिसाद कुणाला फायदेशीर तर कुणाला धक्कादायक ठरणार, याचा अंदाज बांधला जात आहे. या निवडणुकीचे निकाल नागपूरच्या स्थानिक राजकारणाची पुढील दिशा ठरवणारे ठरू शकतात.



नागपूर - ३८ प्रभागात १५१ नगरसेवकांसाठी गुरुवारी झालेल्या महापालिका निवडणुकीत ५१ ३८% मतदान झाल्याचे पुढे आले आहे. अर्थातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपुरात भाजप, शिवसेना महायुती सत्ता कायम ठेवेल असे दिसत असले तरी हा मतांचा घसरलेला टक्का नेमका कुणाला धक्का देणार ते आता काही वेळातच स्पष्ट होणार आहे. भाजपने विजयाचा जल्लोष साजरा करण्याची पूर्वतयारी सुरू केली आहे.

उमेदवार, समर्थक निकालासाठी सज्ज झाले आहेत. मतमोजणीसाठी शहरातील दहाही झोन, मतमोजणी केंद्र सज्ज झाले आहेत. ३००४ मतदान केंद्रावरून ईव्हीएम रात्री उशिरा पोहचल्या. ४००९ कंट्रोल युनिट आणि १० हजार ९२८ बॅलेट युनिटची मदत घेण्यात आली. आज शुक्रवारी १६ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता मतमोजणी सुरू होईल. प्रत्येक निवडणूक निर्णयाधिकारी यांच्याकडे २० टेबल ईव्हीएमसाठी तर पोस्टल, बॅलेटसाठी ४ टेबल असणार आहेत.

# दर्यापूरातील सुवर्णकारासह सर्व व्यावसायिकांची पोलिस स्टेशनमध्ये बैठक

## प्रतिष्ठानमध्ये येतांना मास्क,हेल्मेट,ओढणी,दुपट्टा,रुमालही नकोच

### अन्यथा प्रवेश मिळणार नाही, सर्वानुमते ठराव झाला पारित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ खल्लार-** दर्यापूर शहरात मागील काही दिवसात ज्वेलर्स फोडीच्या घटना व इतर प्रतिष्ठान मध्ये मोठ्या प्रमाणात चोरीच्या घटना घडल्या होत्या. बनोसा मार्गावरील विक्रम ज्वेलर्स आणि बस स्थानकासमोरील सचिन हिरुळकर ज्वेलर्स आणि एका हार्डवेअर मध्ये पाणी मोटर चोरीची घटना घडली असता या घटनेत लाखो रुपयांचे ज्वेलर्स मालकांचे नुकसान झाले. त्या अनुषंगाने दर्यापूर पोलिस स्टेशन येथे शहरातील सर्व सुवर्णकार व शहरातील सर्व व्यावसायिकांची बैठक बोलावण्यात आली.त्या सभेमध्ये सुरक्षेच्या दृष्टिकोनातून विविध नियमावली जाहीर करण्यात आली. ज्वेलर्समध्ये व इतरही प्रतिष्ठानात ग्राहकांना मास्क व तोंडाला रुमाल, हेल्मेट दुपट्टा, ओढणी, चेहरा झाकून आलेल्यांना पूर्णपणे निषेध असणार आहे. तर ग्राहकाचा संपूर्ण चेहरा दिसायला हवा ज्यामुळे ह्या चोरीच्या घटनांना आळा बसणार हा मुख्य हेतू समोर ठेवून सुवर्णकारांनी व व्यावसायिकांनी हा ठराव पोलिस स्टेशनमध्ये पारित केला. ज्यामुळे चोरीच्या घटनेला आळा बसेल तसेच सुवर्णकारांनी व इतरही व्यवसायिकांनी विविध भागामध्ये सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे असेही सांगीतले. या बैठकीला दर्यापूर पोलिस स्टेशनचे ठाणेदार सुनिल वानखडे यांनी मार्गदर्शन केले.बैठकीला शहरातील सुवर्णकार व व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



> मौल्यवान वस्तू आणि दागदागिने तसेच नगदी रुपये शक्यतो कोणत्याही अस्थापनामध्ये ठेवू नये. स्ट्राँग रूम मध्ये ठेवल्यास सुरक्षित राहील. ज्याकडे तिजोरी नाही, अशांनी आपली रोकड आणि मौल्यवान वस्तू आस्थापना मध्ये न ठेवता घरी घेऊन जावी. तसेच वाहतुकी संदर्भात सुद्धा आपल्या आस्थापनेसमोरील वाहने येण्या जाण्यास अडथळे होईल अशा पद्धतीने पार्क न करण्याबाबत आपल्या ग्राहकांना वेळोवेळी सूचना देत रहाव्या.
>
> **-सुनिल वानखडे ठाणेदार, दर्यापूर**

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. १६ जानेवारी २०२६ शहर/ग्रामिण

## मुख्य निवडणूक निरीक्षक

# डॉ. बास्टेवाड व अनिल खंडागळे यांनी केली विविध केंद्रांची पाहणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती–** अमरावती महानगरपालिकेच्या हद्दीतील विविध झोन व प्रभागांमधील मतदान केंद्रांची मुख्य निवडणूक निरीक्षक डॉ. भरत एन. बास्टेवाड (भा.प्र.से.), आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा), नागपूर व निवडणूक निरीक्षक अनिल खंडागळे अप्पर जिल्हाधिकारी यांनी पाहणी केली. या पाहणीदरम्यान मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था, मतदारांसाठीची सोय-सुविधा तसेच निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी करण्यात आलेल्या तयारीचा आढावा घेण्यात आला.

तसेच शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव देशमुख स्टेडीयम स्पोर्ट व वाणिज्य संकुल, नवसारी, येथील मतमोजणी केंद्र येथे पाहणी केली व मतमोजणी केंद्राच्या व्यवस्थेबाबतचा आढावा घेण्यात आला. पाहणीदरम्यान मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था, मतदारांसाठी उपलब्ध सोय-सुविधा तसेच निवडणूक प्रक्रियेचे सुरळीत आयोजन सुनिश्चित करण्यासाठी केलेल्या तयारीचा बारकाईने आढावा घेण्यात आला. अधिकार्यांनी प्रत्येक केंद्राच्या तयारीसंबंधी माहिती दिली, तर मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक यांनी आवश्यक त्या सुधारणा व मार्गदर्शनाची सूचना केली.

मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. भरत एन. बास्टेवाड यांनी पाहणीदरम्यान सांगितले की, 'मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधा आणि सुरक्षा व्यवस्थेवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. प्रत्येक मतदाराला सुरक्षित आणि आरामदायक वातावरणात मतदान करण्याची संधी मिळणे ही आमची प्राथमिकता आहे. यावेळी निवडणूक निरीक्षक अनिल खंडागळे यांनी सांगितले की, 'सुरक्षा व व्यवस्थापनाबाबत कोणतीही चुक होणार नाही, आणि प्रत्येक मतदान केंद्रावर कर्मचार्यांची योग्य तैनाती सुनिश्चित केली जाईल. तसेच, मतदान प्रक्रियेत येणार्या अडचणी आणि तांत्रिक समस्या त्वरित सोडविण्याचे नियोजन केले आहे.'

पाहणीदरम्यान मतदान केंद्रांवरील प्रवेशद्वार, प्रतीक्षालय, मतदारांची बसण्याची सोय, विजेची व पाण्याची सुविधा, तसेच शौचालये आणि दिवे यांची तपासणी करण्यात आली. तसेच, आरोग्य आणि आपत्ती व्यवस्थापनासंबंधी आवश्यक तयारीचा देखील आढावा घेण्यात आला.

पाहणीदरम्यान निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततेत व नियमांनुसार पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सूचनाही संबंधित अधिकार्यांना देण्यात आल्या.

## अचलपूर नगरपालिकेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद

# काँग्रेसच्या खुशिंदा बानो अताउल्लाशा पहिल्या महिला उपाध्यक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अचलपूर–** अचलपूर नगरपालिकेच्या राजकीय इतिहासात प्रथमच महिला उपाध्यक्ष म्हणून निवड होण्याचा मान काँग्रेसच्या खुशिंदा बानो अताउल्ला शा यांना मिळाला आहे. दि. १५ जानेवारी रोजी पार पडलेल्या उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीत त्यांनी भाजपाच्या गटनेत्या व नगरसेविका हेमा दिलीप आसवानी यांचा पराभव करत महत्त्वपूर्ण विजय मिळवला. या निवडणुकीमुळे अचलपूरच्या स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांची आणि व्यापक चर्चेची सुरुवात झाली आहे.



नगरपालिकेच्या सभागृहात दुपारी उपाध्यक्ष तसेच स्वीकृत सदस्यांची निवड प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेत नगराध्यक्ष रूपाली अभय माथने पीठासीन अधिकारी म्हणून उपस्थित होत्या, तर मुख्याधिकारी धिरज गोहाड यांनी संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पाहिली. शांततापूर्ण आणि नियमबद्ध वातावरणात ही निवडणूक पार पडली.

उपाध्यक्ष पदासाठी एकूण चार उमेदवारांनी नामनिर्देशन दाखल केले होते. काँग्रेसकडून खुशिंदा बानो अताउल्ला शा, भाजपाकडून हेमा दिलीप आसवानी, तर अपक्ष व प्रहार समर्थित शहर विकास आघाडीकडून विजय धावानी आणि राज पाटील यांनी उमेदवारी अर्ज सादर केले होते. मात्र ठरलेल्या वेळेत विजय धावानी व राज पाटील यांनी आपले नामनिर्देशन मागे घेतल्याने निवडणूक थेट काँग्रेस आणि भाजपामध्येच रंगली.

मतदान प्रक्रियेत सर्वप्रथम ल. ज. दिक्षीत यांनी काँग्रेसच्या खुशिंदा बानो यांच्या समर्थनार्थ हात उंचावला. त्यांच्या पाठोपाठ अपक्ष, एमआयएम, राष्ट्रवादी काँग्रेस तसेच काँग्रेसच्या नगरसेवकांनी एकत्र येत खुशिंदा बानो यांना भक्कम पाठिंबा दिला. या गटाकडून एकूण २३ नगरसेवकांचे समर्थन मिळाल्याने खुशिंदा बानो अताउल्ला शा मोठ्या मताधिक्याने विजयी ठरल्या.

खुशिंदा बानो यांच्या समर्थनार्थ ल. ज. दिक्षीत, अपक्ष नगरसेविका सुशिला देवीदास इंगळे, शाहीन परविन शे. बिसमिल्लाह, एमआयएमचे से. जावेद सै. युसुफ, रुखसाना बी. मो. इसा, जुलेखा बानो रहीम खान, राष्ट्रवादी काँग्रेसचे फिरोज खाँ सुलतान खाँ, शमशेर खान बिसमिल्ला खान, काँग्रेसचे गटनेते असलम वंजारा, हिना कौसर खाजे खा, मो. राजीक मो. सादीक, मारिया अंजुम मो. अफजल, अ. सलीम अ. सादीक, कलीम शाह शब्बीर शाह, सुमैय्या बख्तियार रऊफ खान, मो. शब्बीर शे. हातम, मौ. सईद मो. सादीक, ममता मधुकर घोरे, जलील अहमद खान, नसरीन बानो शे. सुभान, मो. नाझिम मो. नजीर, कनिजा बानो हुसेन खाँ आदी नगरसेवकांनी हात उंचावून समर्थन दिले.

दुसरीकडे भाजपाच्या उमेदवार हेमा आसवानी यांच्या बाजूने नगराध्यक्ष रूपाली अभय माथने, अपर्णा जितेंद्र रोडे, अक्षय पखाले, सुरेंद्रकुमार तांबे, पद्मिनी बेंडे, वैशाली विनोद पोटे, अक्षरा लहाने, शिला साखरे, दुर्गा सोनपरोते, चंद्रेश बहोरिया, तसेच अपक्ष व प्रहार गटाचे गटनेते मनोज नंदवंशी, विजय धावानी, राज पाटील, दिपाली जवंजाळ, दर्शना ठाकूर, सारिका डांगे, भारती पडी, कविता आखुड अशा एकूण १८ नगरसेवकांनी समर्थन दर्शवले.

या मतदानात काँग्रेसच्या खुशिंदा बानो अताउल्ला शा यांना २३ मते, तर भाजपाच्या हेमा आसवानी यांना १८ मते मिळाली. विशेष म्हणजे माजी नगराध्यक्ष राहिलेले विद्यमान नगरसेवक, एमआयएम, राष्ट्रवादी काँग्रेस तसेच अपक्ष गटनेते आणि प्रहार समर्थक असूनही भाजपाच्या उमेदवाराला पराभव स्वीकारावा लागला.

या निवडणुकीत ल. ज. दिक्षीत यांची भूमिका निर्णायक ठरली. त्यांनी शेवटपर्यंत आपल्या गटाशी प्रामाणिक राहत सर्व नगरसेवकांना एकत्र बांधून ठेवले. विशेष बाब म्हणजे काँग्रेस व दिक्षीत गटाला व्हीप काढण्याचीही गरज भासली नाही आणि काँग्रेसचा उमेदवार उपाध्यक्षपदी विराजमान झाला. याउलट भाजपाला मात्र व्हीप काढावा लागला, तरीही अपेक्षित यश मिळू शकले नाही.

राजकीय विश्लेषकांच्या मते, ही निवडणूक केवळ पक्षीय न राहता जातीय व सामाजिक समीकरणांवर आधारित ठरली. 'सबका साथ, सबका विकास' या भूमिकेवर लढवली गेलेली ही निवडणूक अचलपूरच्या राजकारणात विशेष चर्चेचा विषय ठरली आहे.

अचलपूर नगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच महिला उपाध्यक्ष म्हणून खुशिंदा बानो अताउल्ला शा यांनी पदभार स्वीकारल्याने महिला नेतृत्वाला बळ मिळाले असून, त्यांच्या कार्यकाळाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मृतावस्थेत आढळले बिबट्याचे पिल्लू

## जांभळा शेत शिवारातील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ पथ्रोट–** नजीकच्या मौजा जांभळा शेत शिवारात बिबट्याचे मृतावस्थेतील पिल्लू आज गुरुवार १५ जानेवारी रोजी आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. शवविच्छेदनानंतरच मृत्यूचे खरे कारण माहिती पडणार असल्याचे वनविभागाचे म्हणणे आहे. घटनास्थळावर वन विभागाच्या पथकाकडून श्वानपथकाच्या सहकार्याने शोध मोहीम सुरू करण्यात आली.



माहितीनुसार गुरूवारी परसापूर येथील डॉ.मनोज हरणे यांच्या मौजा जांभळा शेत शिवारातील रखवालदाराने सकाळी साडेसहा वाजताच्या दरम्यान एक बिबट्याचे लहान पिल्लू मृत अवस्थेत रस्त्यावर पडले असल्याबाबत त्यांना फोनवरून माहिती दिली. त्या आधारे डॉ. हरणे यांनी घटनास्थळी जाऊन पाहिले असता त्यांना मृत पिल्लू हे बिबट्याचे आहे याबाबत खात्री पटल्यावर याची माहिती त्यांनी पथ्रोट ठाण्यात दिली. पोलिसांनी ही माहिती वन विभागाला कळविल्या नंतर सहाय्यक वनसंरक्षक ज्ञानेश्वर देसाई यांच्या मार्गदर्शनात वनपरिक्षेत्र अधिकारी दिनेश वाळके हे आपल्या चमूसह घटनास्थळी पोहोचले. त्या ठिकाणी पाहणी केल्यानंतर मृत पिल्लू मादी बिबट असून त्याचे वय दोन ते अडीच महिने, वजन जवळपास चार किलो असल्याचे निदर्शनास आले.

त्याच्या शरीरावरील इतर माहितीच्या आधारे पंचनामा करण्यात आला. मृत्यूचे कारण शवविच्छेदना नंतरच कळू शकणार आहे. पुढील तपास वन विभागाचे पथक करत आहे.

## अचलपूर नगरपरिषदेतील कथित भ्रष्टाचाराच्या विरोधात आमरण उपोषणाचा इशारा

# अनुसूचित जाती वस्ती विकास योजनांत अनियमितता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अचलपूर–** अचलपूर नगरपरिषदेत अनुसूचित जाती वस्ती विकास योजनेंतर्गत गेल्या सुमारे १५ वर्षांपासून सुरू असलेल्या कथित भ्रष्टाचार, अनियमितता आणि निधीच्या गैरवापराविरोधात सामाजिक आरटीआय कार्यकर्ते किशोर केशवराव मोहोड यांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. यासंदर्भात त्यांनी महाराष्ट्र शासन, राज्य मानवी हक्क आयोग, तसेच संबंधित वरिष्ठ प्रशासकीय व पोलीस अधिकार्यांना लेखी नोटीस पाठवली असून, वेळेत ठोस कारवाई न झाल्यास १६ फेब्रुवारी २०२६ पासून आमरण उपोषण सुरू करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.किशोर मोहोड यांनी दिलेल्या नोटीसमध्ये नमूद केल्यानुसार, राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांनी प्रकरण क्रमांक ६१४२/१०१८ अंतर्गत दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. मात्र, आदेशाला एक वर्ष उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही, असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. आयोगाच्या आदेशांचे पालन न करता प्रकरण जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवण्यात आल्याने संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.नोटीसमध्ये पुढे असा आरोप करण्यात आला आहे की, अचलपूर नगरपरिषदेमधील काही जातीयवादी अधिकारी व पदाधिकार्यांनी परस्पर संगनमत करून अनुसूचित जाती वस्ती विकास योजनांतील निधीचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर केला. रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच मूलभूत सुविधांसाठी मंजूर असलेला कोट्यवधी रुपयांचा निधी कागदोपत्री खर्च दाखवून प्रत्यक्षात कामे निकृष्ट दर्जाची किंवा अपूर्ण ठेवण्यात आली, असा दावा मोहोड यांनी केला आहे.या कथित घोटाळ्यांबाबत



त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला असून, विविध विभागांकडे तक्रारी, निवेदने व पुरावे सादर केले असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. मात्र, दोषींवर कारवाई करण्याऐवजी प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. शासनस्तरावरून वारंवार दुर्लक्ष होत असल्याने आणि न्याय न मिळाल्याने शेवटी आमरण उपोषणाचा टोकाचा निर्णय घ्यावा लागत असल्याचे किशोर मोहोड यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता त्यांनी पोलीस महासंचालक, पोलीस आयुक्त मुंबई, नगरपरिषद प्रशासन संचालनालय बेलापूर (मुंबई) तसेच संबंधित वरिष्ठ पोलीस व प्रशासकीय अधिकार्यांना आवश्यक कारवाईसाठी माहिती दिली आहे. मानवी हक्क आयोगाच्या आदेशांची अंमलबजावणी करून स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी, दोषी अधिकारी व पदाधिकार्यांवर कठोर कारवाई करावी आणि अनुसूचित जाती समाजावर झालेल्या अन्यायाला न्याय द्यावा, अशी ठोस मागणी त्यांनी केली आहे.

जर निर्धारित कालावधीत न्याय मिळाला नाही, तर १६ फेब्रुवारी २०२६ पासून आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा मोहोड यांनी दिला आहे. या इशार्यामुळे अचलपूर नगरपरिषद प्रशासनासह जिल्हा व राज्य पातळीवरील यंत्रणांचे लक्ष वेधले गेले आहे.

# शेतकर्‍यावर हात उचलणार्‍या मस्तवाल अधिकार्‍याचा प्रहारकडून जाहीर निषेध

## बच्च कडू थेट पीडित शेतकर्‍यांच्या घरी!

**अमरावती/प्रतिनिधीः–** ऋषिकेश पवार (रा. गोगरी, ता. मंगरुळ पीर, जि. वाशीम) या निष्पाप शेतकर्याला कृषी अधिकारी, मंगरुळ पीर याने केलेली मारहाण ही केवळ एका शेतकर्यावरची नाही, तर संपूर्ण शेतकरी समाजाच्या आत्मसन्मानावरची घणाघाती मार आहे.



शेतकर्यांना मदत करायची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्याच अधिकार्याने शेतकर्यावर हात उचलणे म्हणजे प्रशासनाची संवेदनशून्यता व मस्तवालशाहीचा कळस आहे. ही घटना ऐकताच प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष व माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी आज पीडित शेतकरी ऋषिकेश पवार यांच्या घरी जाऊन प्रत्यक्ष भेट घेतली.

या भेटीदरम्यान बच्चू कडू यांनी संताप व्यक्त करत स्पष्ट शब्दांत सांगितले की, 'शेतकर्यावर हात उचलणारा अधिकारी एक मिनिटही सेवेत राहण्याचा अधिकार ठेवत नाही.अशा मस्तवाल अधिकार्याला तात्काळ सेवामुक्त करून त्याच्यावर कठोरातील कठोर कारवाई झालीच पाहिजे.'

'आज जर शेतकर्याला मारहाण केली जाते, तर उद्या त्याचा आवाजच दाबला जाईल. प्रहार हे अन्याय सहन करणारे नाहीत. शेतकर्याच्या एका अश्रूच्या बदल्यात आम्ही प्रशासनाला हिशेब देऊ!' असा थेट इशाराही बच्च कडू यांनी दिला. शेतकरी हा भिक मागणारा नाही, तो या देशाचा पोशिंदा आहे! त्याच्या सन्मानाशी खेळ झाला, तर प्रहार जनशक्ती पक्ष रस्त्यावर उतरून संघर्ष अटळ आहे,असेही सांगण्यात आले.

# सराईत गुन्हेगार शक्ती वाघमारे एमपीडीएत स्थानबद्ध

## खून, विनयभंग, दंगा, बेकायदेशीर शस्त्रप्रकरणी १५ गुन्हे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती–** अमरावती शहरात दहशत माजवणार्या आणि कायद्याला सतत आव्हान देणार्या कुख्यात सराईत गुन्हेगार शक्ती प्रविण वाघमारे (वय ३०, रा. लायब्ररी चौक, प्रैजरपुरा) याला अखेर एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्ध करण्यात आले आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्थेस गंभीर धोका निर्माण करणार्या या गुन्हेगारावर अमरावती शहर पोलिसांनी निर्णायक कारवाई करत त्याला १४ जानेवारी २०२६ रोजी मध्यवर्ती कारागृह, अमरावती येथे दाखल केले आहे. सन २०१८ पासून शक्ती वाघमारे सातत्याने गुन्हेगारी कृत्यांमध्ये सक्रिय असून, त्याच्याविरोधात प्रैजरपुरा पोलीस ठाण्यात खून, प्राणघातक हल्ला, विनयभंगाच्या उद्देशाने शब्दोच्चार व हावभाव, शस्त्रसज्ज दंगा, अश्लील कृत्ये, जीवे मारण्याच्या धमक्या, जबर दुखापत, गुन्हेगारी, बेकायदेशीर नजरकैद, शांतता भंग, अवैध शस्त्र बाळगणे, अधिसूचना व हद्दपार आदेशाचे उल्लंघन अशा स्वरूपाचे एकूण १५ गंभीर गुन्हे दाखल आहेत. विशेष म्हणजे, यापूर्वी त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई आणि तडीपारीचे आदेश देण्यात आले होते. मात्र, या सर्व कारवायांना न जुमानत तो पुन्हा पुन्हा गुन्हेगारीत सक्रिय राहिल्याने अखेर पोलिसांना एमपीडीएअंतर्गत कठोर पाऊल उचलावे लागले.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट (प्रैजरपुरा पोलीस ठाणे) यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर करण्यात आली. सदर प्रस्ताव सहायक पोलीस आयुक्त कैलाश पुंडकर, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, रमेश धुमाळ यांच्या माध्यमातून पुढे पाठविण्यात आला. गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, पोलीस निरीक्षक सीमा दाताळकर (प्रशासन) व पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेतील एमपीडीए सेलचे सपोनि इम्रान नायकवडे, एएसआय अजय मिश्रा, चेतन कराडे, तसेच प्रैजरपुरा पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार संदीप देशमुख यांनी या प्रस्तावाची संपूर्ण पूर्तता केली. प्रस्तावाची तपासणी करून पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी १४ जानेवारी २०२६ रोजी एमपीडीए अंतर्गत स्थानबद्धतेचा आदेश पारित केला. त्यानुसार प्रैजरपुरा पोलीस ठाण्याच्या माध्यमातून आदेश तामील करून वाघमारेला तात्काळ कारागृहात दाखल करण्यात आले. आगामी सण-उत्सव तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहर पोलीस आयुक्तालय हद्दीतील सराईत गुन्हेगारांची माहिती संकलित करून त्यांच्यावर कडक प्रतिबंधात्मक कारवाई केली जाणार असल्याचा स्पष्ट इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था बिघडवणार्यांना यापुढे कोणतीही माफी दिली जाणार नाही, असे संकेत या कारवाईतून मिळाले आहेत.




# आज अमरावती महापालिकेला मिळणार ८७ नगरसेवक

## ६६१ उमेदवार निवडणूक रिंगणात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

महापालिकेच्या २२ प्रभागातील ८७ जागेसाठी ८०५ केंद्रावर गुरुवारी १५ जानेवारी रोजी मतदान पार पडले. १६ जानेवारी रोजी नवसारी स्थित महापालिकेच्या क्रीडा संकुलात सकाळी दहा वाजता पासून मतमोजणी होणार आहे. दुपारी एक वाजता पर्यंत महापालिकेत कोणत्या पक्षाची सत्ता स्थापन होईल याचा कल स्पष्ट होईल.





महापालिकेतील मतदारांची संख्या ६ लाख ७७ हजार १८० असून २२ प्रभागात ८७ जागेसाठी तब्बल ६६१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. त्यातही जवळपास १२० अपक्ष उमेदवार असून यात बंडखोरांचा ही समावेश आहे. त्यामुळे ते कोणाचे गणित बिघडवितात याकडे लक्ष लागले आहे.

२०१७ मध्ये अमरावती महापालिका निवडणुकीत भाजप ने सर्वाधिक ४५ जागा जिंकून सत्ता मिळवली होती, तर शिवसेनेने चांगली कामगिरी केली होती. कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीची कामगिरी निराशाजनक होती, ज्यात भाजपने अपक्ष आणि इतर पक्षांच्या मदतीने महापालिकेत सत्ता स्थापन केली होती. महापौर पदही भाजपलास मिळाले होते. मागील निवडणुकीत मतदानाची टक्केवारी ५४.५४ज़् होती.



### यांच्यामुळे गाजली निवडणूक:

महापालिका निवडणूक ही प्रामुख्याने कार्यकर्त्यांची असते. मात्र ही निवडणूक पहिल्यांदाच थेट राज्य पातळीवरच्या नेत्यांमुळे विशेष ठरली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, एमआयएम चे प्रमुख असदुद्दीन ओवेसी, नितेश राणे, यशोमती ठाकूर यांच्यासारख्या दिग्गज नेत्यांनी आपापल्या पक्षाच्या उमेदवारांसाठी प्रचार सभा घेतल्या. मात्र या सभांचा किती प्रभाव पडतो ही निवडणूक निकाल निश्चित करणार आहे.



### भाजपचे गणित शिंदे सेना बिघडविणार:

भाजप आणि शिवसेना शिंदे गटाची युती महापालिका निवडणुकीत ऐन वेळेवर तुटली. त्यामुळे शिंदे सेनेने ६७ जागांवर स्वतंत्र निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला. त्यातच भाजपमधील उमेदवारी न मिळालेले असंतुष्ट आणि बंडखोर थेट शिवसेनेचा धनुष्यबाण घेऊन निवडणूक रिंगणात आहेत. साहजिकच याचा फटका भाजपला बसतो आहे. अनेक निष्ठावंत कार्यकर्त्यांवरही भाजपने तिकीट वाटपात अन्याय केलाचा आरोप आहे. त्यामुळे मागील निवडणुकीतील ४५ जागांचा आकडा भाजप खरंच कायम राखणार का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. अप्रत्यक्षरीत्या भाजपनेच शिंदे सेनेला ताकद दिल्याचे बोलल्या जात आहे. त्यात युवा स्वाभिमानशी देखील भाजपची युती तुटल्यामुळे भाजप स्वबळावर किती जागा जिंकणार, हे पहावे लागणार आहे.



### वंचित-युनायटेड फोरम निर्णायक

महापालिका निवडणुकीत तब्बल ४७ जागांवर वंचित बहुजन आघाडी आणि युनायटेड फोरम निवडणूक रिंगणात आहे. अमरावती विधानसभा निवडणुकीत डॉ.अलीम पटेल यांनी तब्बल ५४ हजार मते घेऊन प्रस्थापितांना हादरा दिला होता. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वात वंचित आणि युनायटेड फोरम महापालिका निवडणुकीत लढत आहे. कॉंग्रेस, राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना, बीएसपी आणि एमआयएमच्या उमेदवारांच्या विरोधात वंचित आणि युनायटेड फोरमचे उमेदवार लढत देत आहेत. निवडणूक निकालावर याचा निर्णायक परिणाम होण्याची शक्यता आहे. याउलट आमदार सुलभा आणि संजय खोडके यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी अजित पवार गट महापालिकेतील सर्वच ८७ जागांवर लढत आहे.

### २०१७ मधील पक्षीय बलाबल

- भाजप – ४५
- कॉंग्रेस – १५
- शिवसेना – ७
- अपक्ष – १
- बसपा – ५
- आरपीआय – १
- एमआयएम – १०
- युवा स्वाभिमान – ३
- एकूण: ८७

### २०२६ मधील प्रमुख पक्षांचे उमेदवार:

- राष्ट्रवादी (अजित पवार): ८५
- कॉंग्रेस : ७४
- भाजप: ६८
- शिंदे सेना : ६७
- युवा स्वाभिमान पक्ष: ३६
- बसप :३४
- वंचित: ४७
- ठाकरे सेना: ४१
- एमआयएम: २५
- राष्ट्रवादी(शरद पवार): १४



### पोलीस बंदोबस्त:

महापालिका निवडणूक व मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर शहरात १३२ पोलीस अधिकार्यांच्या सह १६५० पोलीस कर्मचारी तैनात आहेत. यामध्ये तीन पोलीस उपायुक्त, सात सहाय्यक पोलीस आयुक्त, ३१ पोलीस निरीक्षक, ९१ उपनिरीक्षक यांचाही समावेश आहे. यासह ९०० होमगार्ड तैनात करण्यात आले आहे. मतदान व मतमोजणी शांततेत पार पडण्यासाठी गुन्हेगारांवर करडी नजर ठेवली जात आहे तर ७३७ जणांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. आठ विशेष पेट्रोलिंग पथकही कार्यरत आहेत. अमरावती शहर पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनात महापालिका निवडणुकीत बंदोबस्त तैनात आहे.

# जवाहर स्टेडियम, गडगडेश्वर वडाळी मध्ये ईव्हीएम पडली ईव्हीएम

## मशीनच्या उलटया क्रमावर शिंदे सेनेचा आक्षेप

### -मतदानादरम्यान गोंधळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

महानगरपालिका निवडणुकीसाठी गुरुवारी सकाळी ७.३० वाजता पासून मतदान प्रक्रिया सुरू झाली. यादरम्यान शहरातील जवाहर स्टेडियम प्रभागातील गर्ल्स हायस्कूल येथील ईव्हीएम मशीन २० मिनिटं बंद होती. यामुळे मतदारांना मतदान प्रक्रियेसाठी बराच वेळ वाट पाहावी लागली. सकाळी ७.३० वाजता मतदार मोठ्या उत्साहात जिल्हा परिषदेच्या गर्ल्स हायस्कूल या मतदान केंद्रावर पोहोचले होते. दरम्यान, या मतदान केंद्रावरील खोली क्रमांक २ मध्ये एक मतदार मतदानासाठी आत गेला असता, ईव्हीएम सुरू होत नव्हते. मतदान प्रक्रिया होत नसल्यानं मतदान केंद्रावरील कर्मचार्यांची काही वेळ तारांबळ उडाली. दरम्यान २० मिनिटानंतर ईव्हीएम मधील तांत्रिक अडचण सोडविण्यात मतदान केंद्रावरील कर्मचार्यांना यश आलं. बंद पडलेली ईव्हीएम मशीन सुरळीत सुरू झाल्यावर गर्ल्स हायस्कूल या मतदान केंद्रावरील खोली क्रमांक दोन मध्ये मतदान प्रक्रिया सुरळीत झाली.

**वडाळीत मशीनची बटन समस्या**–दरम्यान या खोलीत ज्यांचं मतदान होतं त्या मतदारांना मात्र बराच वेळ बाहेर उभं राहावं लागलं. शहरातील आणखी एका मतदान केंद्रावर मतदारांना गैरसोयीचा सामना करावा लागला. वडाळी येथील शाळा क्रमांक १४ या ठिकाणी मतदानासाठी आलेल्या मतदारांना ईव्हीएम वरील चार क्रमांकाचं बटन दबत नसल्याचं लक्षात आलं. यानंतर इतर ५ ते ६ जणांनी ते बटन दाबून पाहिलं. अशा स्थितीत अर्धा तास मतदान प्रक्रिया खोळंबली. वडाळी येथील शाळा क्रमांक १४ या ठिकाणी खोली क्रमांक चार मध्ये ब गटाच्या उमेदवारांसाठी असणार्या ईव्हीएम मधील चौथ्या क्रमांकाचं बटण दबत नाही, हे लक्षात येताच अजित पवारांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या उमेदवार रेणुका पवार यांनी निवडणूक प्रक्रियेवर आक्षेप घेतला. या मतदान केंद्रावर खोली क्रमांक चार मध्ये मतदान प्रक्रिया रोखण्याची त्यांनी विनंती केली. यानंतर या खोलीतील मतदान प्रक्रिया थांबली आहे. विशेष म्हणजे अर्ध्या तासापासून मतदान प्रक्रिया थांबली असून देखील ९ वाजेपर्यंत ही प्रक्रिया सुरळीत करण्याकरिता महापालिका प्रशासनाच्या वतीनं कुठलीच दखल घेतली गेली नसल्यानं या मतदान केंद्रावर गोंधळाचे वातावरण निर्माण झालं. प्रभाग क्रमांक १७ गडगडेश्वर मधील शारदा विद्यालय केंद्रात ईविएम मशीन बंद पडल्याने मोठा गोंधळ उडाला. ईव्हीएम बंद पडल्यानंतर मशीन बदलण्यात नाही आली असा आरोप करत शिंदे गटाच्या उमेदवाराने येथे आक्रमक पवित्र घेतला. यामुळे येथे तनाव निर्माण झाला होता.





### प्रवीण पोटे यांना रहावे लागले ताटकळत

यासह गाडगे नगरातील प्रगती विद्यालयातील मशीनमध्येही तांत्रिक बिघाड झाला होता. हा प्रकार सकाळी साडेसात वाजता मतदान सुरू होण्याच्या वेळेवरच झाला. त्यामुळे माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे यांना ताटकळत राहावे लागले. त्यांनी नाराजी ही व्यक्त केली. यासह अनेक प्रभागात एकाच कुटुंबातील सदस्यांची नावे वेगवेगळ्या केंद्रावर असल्यामुळे प्रचंड गोंधळ झाला. काहींची नावे ही शेवटपर्यंत सापडली नाही. त्यामुळे अशा मतदारांनी मनपा प्रशासनावर प्रचंड रोष व्यक्त केला. अनेक जण मतदानापासून वंचित राहिले. महापालिकेच्या ॲपवरून दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याची घटना ही समोर आली.

**लोकशाहीचा खून: माजी आमदार अभिजीत अडसूळ**

दरम्यान अमरावती महापालिकेतील अनेक प्रभागात ईव्हीएम मशीन उलट्या क्रमाने ठेवण्यात आल्या होत्या. म्हणजेच अ,ब, क,ड अशा न ठेवता ड,क,ब,अ अशाप्रमाणे ठेवण्यात आले. त्यामुळे यावर शिवसेना शिंदे गटाचे माजी आमदार अभिजीत अडसूळ यांनी आक्षेप घेतला. ही लोकशाहीची हत्या असल्याचे देखील ते म्हणाले. त्यांनी जिल्हाधिकारी व निवडणूक आयोगावरही आरोप केले. भारतात राहून आपण उलट्याक्रमाणे ईव्हीएम कशा काय मतदानासाठी ठेवू शकतो असा सवाल ही त्यांनी केला.

# नियोजनाबाबत प्रशासनाचे दावे ठरले फोल

## मतदान यादीच्या घोळामुळे अनेक केंद्रावर गोंधळ

### -शेवटच्या क्षणापर्यंत मतदारांची धावाधाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**महापालिका निवडणुका साठी आज गुरुवार १५ जानेवारीच्या सकाळी ७.३० वाजता मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली. मात्र शहरात अनेक ठिकाणी प्रत्यक्ष मतदान करण्यापेक्षा मतदान केंद्र शोधण्यातच मतदारांचा मोठा वेळ वाया गेल्याचं दिसून आलं. काही मतदारांना नाव न मिळाल्याने ते मतदान न करता बाहेर पडले. तर काही ठिकाणी पती चे नाव एकाकडे तर पत्नीचे नाव दुसर्या तर मुलांचे नाव तिसर्या सेंटरवर असल्याने गोंधळ उडाला. मतदारांना मोठ्या अडचणीचा सामना निवडणूक प्रक्रिये दरम्यान करावा लागला. शासनाच्या वतीने केलेल्या नियोजनाची दावाही फोल निघाला. तासंतास मतदारांना इकडे तिकडे भटकावे लागले आणि काही लोकांना तर नाव न मिळाल्याने परत मतदान न करता घरी जावे लागले. काही मतदारांची नावे मागील यादीत होते मात्र अद्यावत मतदार यादीत ती वगळण्यात आल्याचे निदर्शनात आले तर काही ठिकाणी नावातील चुका,पत्ता बदल किंवा प्रभाग फेरचनेमुळे मतदारांना मतदान केंद्र शोधण्यात अडचणी आल्या. यामुळे मतदारांनी प्रचंड नाराजी व्यक्त केली. मतदानाचा हक्क बजावण्यासाठी नागरिक उत्साहाने बाहेर पडले असता यादीतील त्रुटीमुळे त्यांचा वेळ वाया गेला आणि ते तसेच परत आले. प्रशासनाला याकडे लक्ष द्यायची गरज आहे. मागील निवडणुकीमध्ये पण असाच घोळ झाला होता यानंतरही प्रशासनाने आपल्या चुकीची दुरुस्ती नाही केली. त्यामुळे प्रचंड नाराजी नागरिकांनी व्यक्त केली. अनेक प्रभागांमध्ये वास्तव्यास असलेल्या मतदारांची नावं इतर प्रभागांतील मतदान केंद्रांच्या यादीत असल्याचं आढळून आलं. यामुळे मतदारांमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. योग्य माहितीच्या अभावामुळे अनेक मतदारांना एका केंद्रावरून दुसर्या केंद्रावर फिरावं लागलं. या गैरसोयीमुळे अनेक मतदारांनी नाराजी व्यक्त केली, तर काहींनी मतदान न करताच घरी परतण्याचा निर्णय घेतला. या प्रकारामुळे निवडणूक आयोगाच्या एकूण नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झालं आहे. निवडणूक प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी मतदारांकडून केली जात आहे. एक केंद्रातून दुसर्या वैंद्रात जाण्याची वेळ मतदारांवर आली होती. मतदारांमध्ये प्रशासनाने जनजागृती केली पण त्यांनी केलेले दावे पूर्णतः पोकळ ठरले. यादीमध्ये नाव शोधण्यात मोठा वेळ मतदारांचा वाया गेला. मोबाईल ॲप मध्ये पण मतदारांना यादी बाबत चुकीची माहिती देण्यात येत होती. यामुळे पण मतदारांना अडचणी आल्या. प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेल्या सुमार नियोजनामुळे मतदारांना केवळ मनस्ताप झाला.



# अखेर ख्रिश्ती धर्म परिवर्तन प्रकरणात चांदुर बाजार पोलीसात गुन्हा दाखल

## एका महिलेसह जोसेफ खुदावन, विक्टर खुदावन अनंत मानकर आरोपी इंडियन चिल्ड्रन्स न्यू लाईफ मिशन संस्थाची नोंद रद्द करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६चांदुर बाजार**

चांदूर बाजार शहरातील अखेर धर्म परिवर्तन प्रकरणात ४ जणांन विरुद्ध चांदुर बाजार पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला असून शहरातील अमोल वानखडे यांच्या फिर्यादी वरून आरोपी एका महिलेसह जोसेफ विश्वासराव खुदावन,विक्टर जोसेफ खुदावन व आरोपी अनंत बाबुलाल खुदावन या चार जणांन विरोधात चांदूर बाजार पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला गेल्या अनेक वर्षांपासून इंडियन चिल्ड्रन्स न्यू लाईफ मिशन संस्थाच्या नावावर संडे स्कुलच्या माध्यमातून रविवार च्या दिवशी चांदूर बाजार शहरातिल उदय कॉलनी परिसरात आरोपीकडून चिमुकल्यांना खाऊ भिस्कीट चे आमिष दाखवत ख्रिश्ती धर्म परिवर्तन करण्याचा पाठ पळवल्या जातो फिर्यादी अमोल वानखडे या संस्थे मध्ये १० वर्षा पासून कार्यरत असल्याच बोलल्या जात आहे तर धर्म परिवर्तन करण्यासाठी अमोलला व त्याच्या पत्नीला नोकरीवर लावून देऊ मालकी हक्काचे घर देऊ व मुलांच्या शिक्षणा चा खर्च देऊ असे आमिष दिल्याचा आरोप फिर्यादी अमोल वानखडे यांनी केला त्यानंतर दबाव टाकून दिनांक १९ एप्रिल २०१४ रोजी ख्रिश्ती धर्मातिल बाप्तीस्मा ही विधि करून अमोल व त्याच्या पत्नीला प्रमाणत्र देण्यात आले सदर प्रमाणपत्रावर आरोपी जोसेफ विश्वासराव खुदावंत यांची स्वाक्षरी असल्याचा दावा फिर्यादी



अमोल ने केला आहे अमोल ने सदर प्रमाणपत्र स्वीकारलं असता त्यांच्या दस्ताऐवजावर कोणताही ख्रिश्ती धर्माचा उल्लेख न केल्याच तक्रार मध्ये नमूद केले आहे तर दिनांक १ सप्टेंबर २०२५ ते १ नोव्हेंबर २०२५ दरम्यान दस्ताएवजात ख्रिश्ती धर्माची नोद करा असा दबाव वारंवारावर आरोपींन कडून फिर्यादी अमोलवर टाकण्यात आला तर अमोल वानखडे याने चांदूर बाजार पोलिसात धाव घेत या संस्थे विरोधात तक्रार दाखल केली ठाणेदार अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनात या प्रकरनाची चौकशी करून आरोपीचे बयान घेण्यात आले २० दिवसानंतर दिनांक १४ जानेवारी रोजी चांदूर बाजार पोलिसांनी धर्म परिवर्तन प्रकरणात भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये आरोपींवर कलम २९९,३०२,३(५) ही गंभीर गुन्हे दाखल करण्यात असून अमोलच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या त्यामुळे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा दाखल करण्यात यावा अशी मागणी आता फिर्यादी अमोल वानखडे करीत आहे व इंडियन चिल्ड्रन्स न्यू लाईफ मिशन या संस्थेची नोंद रद्द करण्याची मागणी देखील अमोल ने यावेळी केली आहे.

**संडे स्कुल( धर्मांतराची शाळा थांबवा),येवडा पैसा येथो कुठून?**

चांदुर बाजार शहरातील उदय कॉलनी परिसरात रविवारच्या दिवशी धर्मांतराची शाळा चालतो त्यामध्ये चिमुकल्यांना खाऊ भिस्कीट चे आमिष दाखवत ख्रिश्ती धर्माचा पाठ पळवल्या जातो तर धर्मांतर करण्यासाठी विदेशातून कोटी रुपये येत असल्याच बोलल्या जात आहे रविवार च्या दिवशी सुरु असेलली धर्मांतराची शाळा थांबवा व विदेशातून येणाऱ्या पैसा येतो कसा याची सुद्धा चोकशी करण्याची मागणी आता होत आहे.

**संस्थाची नोंद रद्द करा, आरोपींवर ॲट्रॉसिटी कायदा दाखल करा!**

इंडियन चिल्ड्रन्स न्यू लाईफ मिशन या ख्रिश्ती संस्थेच्या माध्यमातून समाजिक उपक्रम न राबवता आमिष दाखवत धर्मांतरचा उपक्रम राबवण्यात येते आहे त्यामुळे ही संस्था रद्द करण्याची मागणी देखील अमोलने केली आहे व धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून या प्रकरणात आता ॲट्रॉसिटी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी फिर्यादी अमोल वानखडे यांनी केली आहे.

# जिल्हा सामान्य रुग्णालयाचा ऐतिहासिक टप्पा

## वर्षभरात १० हजारांहून अधिक रक्त पिशव्यांचे संकलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

रक्तकेंद्र व रक्त घटक विलगीकरण केंद्र, अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालय विभागाने रुग्णसेवेमध्ये महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. सन २०२५ या वर्षात शासकीय रक्तकेंद्र अमरावती यांनी १० हजार १९० रक्त पिशव्यांचे संकलन केले असून, गेल्या चार वर्षात या रक्तकेंद्राने ४० हजारांहून अधिक रक्त पिशव्यांचे संकलन करून हजारो रुग्णांना जीवनदान दिले आहे. या वर्षात शासकीय रक्तकेंद्राने एकूण २२७ रक्तदान शिबिरे यशस्वीपणे पार पाडली असून, यामुळे सिकलसेल, थॅलेसिमिया, हिमोफेलिया तसेच जटिल शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांना मोठा आधार मिळाला आहे.

जिल्ह्यातील एकमेव शासकीय रक्तपेढी असल्यामुळे हे केंद्र जिल्हा सामान्य रुग्णालय, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, क्षय रुग्णालय आणि अच्च्युत महाराज रुग्णालयासोबतच जिल्ह्यातील खाजगी रुग्णालये व




सहा रक्त साठवणूक केंद्रांना नियमित रक्तपुरवठा करीत असते. जिल्ह्यालगतच्या मेळघाट येथील आदिवासी बांधव, गर्भवती माता, लहान बालके तसेच चिखलदरा व धारणी येथील रुग्णांनाही येथून मोठ्या प्रमाणात रक्ताचा पुरवठा केला जातो. विशेषतः सिकलसेल आणि निमियाग्रस्त रुग्णांना दर पंधरा दिवसांनी रक्ताची गरज भासते, त्यांच्यासाठी हे केंद्र अत्यंत महत्त्वाचे कार्य करीत आहे. खासदार ३६५ दिवस रक्तदान मोहिमेअंतर्गत राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले आणि रक्त केंद्र प्रमुख डॉ. आशिष वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली हे कार्य करण्यात आले असून अविरत सुरु आहे. जनसंपर्क अधिकारी मिलिंद तायडे आणि समुपदेशक योगेश पानझाडे यांच्या अथक प्रयत्नांमुळे व संपूर्ण अधिकारी-कर्मचारी चमूच्या सहकार्यामुळे जिल्ह्यातील रुग्णांना वेळेवर रक्त पुरवठा करणे शक्य होत आहे. रक्ताची ही गरज निरंतर असल्याने जास्तीत जास्त सामाजिक संस्था, महाविद्यालये आणि तरुण मंडळांनी रक्तदान शिबिरांसाठी पुढे यावे, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार व रक्त केंद्रप्रमुख डॉ. आशिष वाघमारे यांनी केले आहे.


# पीक कर्जासाठी खर्च नाही होणार शेतकऱ्यांना आता मुद्रांक शुल्क माफ

## १ जानेवारीपासून अंमलबजावणी झाली सुरू दोन लाखांपर्यंतच्या कर्जासाठी राज्य शासनाची सवलत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

शेतीच्या पीक कर्जासाठीचे मुद्रांक शुल्क संपूर्णपणे माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याची अंमलबजावणी १ जानेवारीपासून सुरू झाली आहे. या निर्णयानुसार दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्जाशी संबंधित विविध दस्तऐवजांवर आकारले जाणारे मुद्रांक शुल्क पूर्णतः माफ केले आहे.

यापूर्वी शेतीच्या पीक कर्जावर प्रत्येक एक लाख रुपयांमागे ०.३ टक्के मुद्रांक शुल्क आकारले जात होते. आता ते लागणार नाही. कर्ज घेताना शेतकऱ्यांचा होणारा ३०० रुपयांपर्यंतचा खर्च वाचणार आहे. दोन लाख रुपयांच्या कर्जावर ०.३ टक्के दराने शुल्क आकारले जायचे. आता या निर्णयामुळे मुद्रांक शुल्क माफ व इतर शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय झाल्याने पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची वाढ होणार आहे. आता पीक कर्ज घेताना लागणारा कागद पत्रांवरील खर्च वाचणार असून, कर्ज प्रक्रिया सुलभ होईल. या निर्णयामुळे कर्ज करारनामे, गहाणखत आणि इतर संबंधित कागदपत्रांवरील शुल्क भरावे लागणार नाही, ज्यामुळे शेतकऱ्यांचा अतिरिक्त आर्थिक भार कमी होईल आणि त्यांना कर्ज मिळवणे सोपे जाईल. यामध्ये पीक कर्जासाठी निष्पादित करण्यात येणारे करार, हक्कविलेख, निक्षेप, हडप, तारण किंवा तारण गहाण, हमीपत्र, गहाणखत, प्रतिभूती बंधपत्र, गहाणाची सूचना पत्रे, घोषणापत्र तसेच त्याला संलग्न असलेल्या कोणत्याही सल्ला किंवा करारपत्रांचा समावेश आहे.



**पीक कर्जावरील मुद्रांक शुल्क माफ**

यापूर्वी दोन लाख रुपयांच्या कर्जासाठी सुमारे ६०० रुपयांचे मुद्रांक शुल्क शेतकऱ्यांना भरावे लागत होते. आता हे शुल्क पूर्णतः माफ करण्यात आल्याने शेतकऱ्यांच्या कर्ज खर्चात थेट कपात होणार आहे.

**अल्प, अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना मोठा आधार**

जिल्ह्यात ३० ते ३५ टक्के शेतकरी हे अल्प व अत्यल्पभूधारक शेतकरी आहेत. शासनाच्या या निर्णयाचा या शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. त्यांची प्रत्येक हंगामाच्या तोंडावर होणारी आर्थिक ओढाताण कमी होण्यास मदत होणार आहे.

**रबीसह खरीप पिकांसाठी सवलत**

शासनाच्या निर्णयानुसार दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्प मुदत पीक कर्जाशी संबंधित सर्व प्रकारच्या दस्तऐवजांवर मुद्रांक शुल्क आकारले जाणार नाही. ही सवलत खरीप आणि रबी हंगामातील पीक कर्जासाठी लागू असेल. या निर्णयाचा फायदा लाखो शेतकऱ्यांना होणार आहे.

**सर्व बँका, सहकारी संस्थांना निर्णय बंधनकारक**

राज्यभरात लागू होणारा हा निर्णय असून, सर्व बँका, सहकारी संस्था आणि कर्जवाटप करणाऱ्या यंत्रणांना तो बंधनकारक राहणार आहे. त्यासाठी आता कर्ज प्रक्रिया आणखी सुलभहोणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना पीक कर्ज घेण्यास प्रोत्साहन व प्रक्रिया सुलभ होणार आहे.

**कर्ज प्रक्रिया होणार जलद**

मुद्रांक शुल्क माफीमुळे कर्ज प्रक्रियेतील अडथळा दूर झाला आहे. यापूर्वी मुद्रांक खरेदी करणे, त्यावर योग्य नोंदी करणे आणि कागदपत्रांची पूर्तता करण्यात वेळ जात असे. आता ही कटकट कमी झाल्याने बँकांकडून कर्ज मिळण्याची प्रक्रिया अधिक जलद होणार आहे.

**३०० रुपये खर्च व्हायचा**

कर्ज घेताना शेतकऱ्यांचा होणारा ३०० रुपयांपर्यंतचा खर्च वाचणार आहे. दोन लाख रुपयांच्या कर्जावर ०.३ टक्के दराने शुल्क आकारले जायचे. शेती उत्पादन खर्च वाढल्याने हा निर्णय अत्यंत दिलासादायक असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. तसेच पीक कर्ज घेताना लागणाऱ्या कागदपत्रांवरील आर्थिक बोजा कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे, तसेच कागदपत्रांची कटकट कमी होणार आहे.

# केंद्र शासनाकडे माहिती, शिफारशी करण्याचे प्राथमिक शिक्षक समितीचे निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शिक्षक पात्रता परीक्षा संदर्भात सातत्याने केंद्र व राज्य सरकारकडे निवेदन केले आहे. आरटीई-२००९ आणि एनसीटीइच्या अधिसूचनांपूर्वी सेवेत असलेल्या शिक्षकांनी वेळोवेळी शासनाने ठरवलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता पूर्ण केली. एनसीइआरटी, एससीइआरटी आणि इतर प्रशिक्षणाद्वारे आपले ज्ञान अद्ययावत केलेले आहे. या शिक्षकांनी अनेक वर्षे विद्यार्थ्यांच्या हितासाठी व शैक्षणिक गुणवत्ता टिकवण्यासाठी निष्ठेने काम केले आहे, त्यामुळे त्यांचे अनुभव आणि कौशल्य शिक्षण व्यवस्थेसाठी अत्यंत मौल्यवान आहेत. विविध शासन निर्णय अधोरेखित करतात की पूर्वी नियुक्त शिक्षकांसाठी टीईटी अनिवार्य नाही. नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार, टीईटी नसल्यामुळे पदोन्नती नाकारणे, स्वेच्छा निवृत्ती भाग पाडणे किंवा सेवा समाप्त करणे योग्य नाही, आणि हे शिक्षकांच्या कौटुंबिक जीवनावर तसेच समाजावर गंभीर परिणाम करू शकते. आर टीइ २०१७ च्या सुधारणानंतर ३१ मार्च २०१५ नंतर नियुक्त शिक्षकांसाठी टीइटी अनिवार्य आहे; मात्र, त्याआधी नियुक्त शिक्षक यामध्ये समाविष्ट नाहीत. त्यामुळे, सेवेत असलेल्या शिक्षकांना टीइटी उत्तीर्ण करण्याची अनिवार्यता सध्याच्या नियमांतून सूट देण्याची, राज्य शासनाने केंद्र सरकारकडे नियमात योग्य बदलासाठी अनुकूल शिफारस करण्याची विनंती करण्यात येते, जेणेकरून शिक्षक, त्यांच्या कुटुंबीय व संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर होणाऱ्या संभाव्य नकारात्मक परिणामांना टाळता येईल आणि शिक्षक आपले ज्ञान, अनुभव व निष्ठा विद्यार्थ्यांच्या हितासाठी अजूनही लाभदायक ठरवू शकतील. अशा प्रकारचे निवेदन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शालेय मंत्र्यांना दिले आहे.

यावेळी उदय शिंदे, विजय कोंबे, राजन कोरगावकर, विजयकुमार पंडित, महादेव माळवदकर, राजन सावंत, आनंदा कांदळकर, विलास कंटेकुरे, सयाजी पाटील, नंदकुमार होळकर, राजेंद्र खेडकर, सुरेश पाटील, किशोर पाटील, सतिश सांगळे, किशन बिरादार, नितीन नवले, राजेश सावरकर, पंडित नागरगोजे, वर्षा केनवडे, सुधाकर सावंत, प्रफुल्ल पुंडकर, सैय्यद शफीक अली आदी उपस्थित होते.


# कॉपीमुक्ती अभियानावर शिक्षण मंडळाचा फोकस

## १९ ते २६ जानेवारीपर्यंत कॉपीमुक्त अभियानांतर्गत जनजागृती सप्ताह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

महाराष्ट्र शासनाच्या कॉपीमुक्त अभियानअंतर्गत इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये गैरप्रकार टाळण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून अमरावती विभागात १९ ते २६ जानेवारी या कालावधीत जनजागृती सप्ताह राबवला जाणार आहे. ज्यात विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना परीक्षेतील सचोटीचे महत्त्व पटवून देण्यासाठी शपथ दिली जाणार आहे.

या अभियानात दहावी, बारावीच्या परीक्षेबाबत महत्त्वाच्या उपाययोजना केल्या आहेत. या उपाययोजनांमुळे परीक्षेचे वातावरण 'कॉपीमुक्त व भयमुक्त ठेवण्याचे उद्दिष्ट आहे. या जनजागृती सप्ताहात विभागातील पाचही जिल्ह्यांत विविध उपक्रम राबवले जाणार असून याबाबत शिक्षण उपसंचालक व माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना लेखी पत्राव्दारे सूचना दिल्या



असल्याची माहिती विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष संदीप संगवे यांनी दिली.

**असे आहे नियोजन**

१९ ते २६ जानेवारी या कालावधीत १९ जानेवारी रोजी लोकप्रतिनिधी, शाळा विकास व व्यवस्थापन समिती सदस्य, गावातील प्रतिष्ठित ग्रामस्थ व माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक यांच्या संयुक्त सभेत कॉपीमुक्त अभियानाची शाळा पातळीवर अंमलबजावणी केली जाणार आहे. २० रोजी कॉपीमुक्त अभियानाची शपथ सर्व शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांत परिपाठावेळी दिली जाणार आहे. २१ जानेवारीला शाळास्तरावर मंडळ शिक्षा सूचीचे वाचन, मंडळाच्या उत्तरपत्रिकेच्या मुख्य पृष्ठाच्या मागील बाजूस असलेल्या सूचना व पत्रावरील सूचनांचे वाचन करणे, गुरूवार, २२ रोजी परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी घ्यावयाचा आहार व आरोग्याची काळजी यावर विद्यार्थ्यांना तज्ज्ञांव्दारे मार्गदर्शन, शुक्रवार, २३ रोजी परीक्षेला सामोरे जाताना अभ्यासाची तयारी, परीक्षा तणावमुक्त वातावरणात कशी देता येईल यावर तज्ज्ञांव्दारे मार्गदर्शन, शनिवार, २४ रोजी कॉपीमुक्त अभियानाच्या जागृतीसाठी कॉपीमुक्त घोषवाक्य, शाळा परिसरात जनजागृती फेरी आणि प्रजासत्ताक दिनी ग्रामसभांमध्ये मुख्याध्यापक, शिक्षकांमार्फत कॉपीमुक्त अभियानाबाबत माहिती दिली जाणार असल्याचे विभागीय शिक्षण मंडळाने सांगितले.

# संकल्प दौडमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

विद्यापीठातील स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना, श्रीरामकृष्ण विवेकानंद समिती व विवेकानंद ग्रंथालय यांच्या विद्यमाने स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्ताने आयोजित संकल्प दौडमध्ये शहरातील शेकडो शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी व मुंबई येथील स्वामी विवेकानंद तत्त्वज्ञानाच्या अभ्यासक श्रध्दा व्यास यांनी हिरवी झेंडी दाखवून संकल्प दौडची विवेकानंद कॉलनी येथून सुरुवात केली. त्यानंतर रुख्मिणी नगर, कॉंग्रेसनगर मार्गे प्रशांत नगर बगीचा येथील स्वामी विवेकानंद यांच्या पुतळ्याला हारार्पण करुन संकल्प दौडचा समारोप केला. प्रारंभी स्वामी विवेकानंद कॉलनी येथील स्वामी विवेकानंद यांच्या पुतळ्याला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व हारार्पण करण्यात आले. यावेळी डॉ. रविंद्र कडू, डॉ. अमरसिंह राठोड, हरिहर जिराफे उपस्थित होते.

# मेळघाटात चिमुकल्यांच्या रक्तात सिकलसेलचे विष

## धारणी-चिखलदऱ्यात ८०० मृत्यूच्या दाढेत आनुवंशिक आजार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ धारणी**

मेळघाटातील चटके कुपोषणाचे सोसणाऱ्या धारणी आणि चिखलदरा तालुक्यांसमोर सिकलसेलचे मोठे संकट आता उभे ठाकले आहे. विशेषतः शून्य ते १० वर्षे वयोगटातील लहान मुलांमध्ये या आजाराचे वाढते प्रमाण अत्यंत चिंताजनक आहे.

ताज्या आकडेवारीनुसार, या दोन्ही तालुक्यांत तब्बल २८४ चिमुकले प्रत्यक्ष या आजाराने बाधित असून, हजारो मुले या आजाराचे वाहक बनले आहेत. एप्रिल २००९ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीतील आकडेवारीनुसार, या दोन्ही तालुक्यांत मोठ्या संख्येने 'कॅरिअर' (वाहक) आणि 'सफरर' (बाधित) रुग्ण आढळून आले आहेत. विशेष म्हणजे, १० ते १५ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये हे प्रमाण चिंताजनक आहे. धारणी आणि चिखलदरा मिळून आतापर्यंत ७,५२९ वाहक आणि ८०३ बाधित रुग्ण समोर आले. प्रशासनाकडून या भागात जनजागृती आणि उपचारांवर



अधिक भर देण्याची गरज आहे.

प्रशासनाची आकडेवारी असलेल्या डेटावरून असे दिसून येते की, १६ ते २० आणि २० वर्षांवरील वयोगटात अविवाहित वाहकांची संख्या लक्षणीय आहे. सिकलसेल हा आनुवंशिक आजार असल्याने, भविष्यातील पिढीला यापासून वाचवण्यासाठी लग्नापूर्वी रक्ताची तपासणी करणे आवश्यक आहे.

**१५ जानेवारीपासून तपासणी**

सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे अरुणोदय ही विशेष सिकलसेल तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. येत्या १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी या महिनाभराच्या कालावधीत राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये ही मोहीम राबविली जाणार आहे.

**वयोगटानुसार परिस्थिती :**

० ते १० वर्षे : धारणीमध्ये ६६५ वाहक आणि १८५ बाधित मुले आहेत, तर चिखलदऱ्यात ५८७ वाहक आणि ९९ बाधित मुले आहेत.

**११ ते १५ वर्षे**

या वयोगटात धारणीत ५९१ वाहक, तर चिखलदऱ्यात ४२७वाहक रुग्ण आढळले आहेत.

**२० वर्षांवरील लोकसंख्या**

२० वर्षांवरील विवाहित आणि अविवाहित व्यक्तींमध्येही हे प्रमाण मोठे आहे. एकट्या धारणी तालुक्यात २० वर्षांवरील २,०५६ विवाहित व्यक्ती सिकलसेलच्या वाहक आहेत. राज्यात आतापर्यंत १ कोटी ५ लाख ८६ हजार चाचण्या झाल्या असून, १२,४२० रुग्ण, १ लाख २४ हजार २७५ वाहक आढळले.

# जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६दर्यापूर**

जिल्हा महिला वबालविकास अधिकारी कार्यालय अमरावतीच्या वतीने अमरावती जिल्हास्तरीय चाचा नेहरू महोत्सव येत्या १९ ते २१ जानेवारी दरम्यान अमरावती येथील मातोश्री विमलाताई देशमुख सभागृह शिवाजीनगर अमरावती या ठिकाणी आयोजित केला आहे. संपूर्ण जिल्ह्यातील बालगृहाचे व इतर विविध योजनांचे विद्यार्थी यांच्याकरिता हा जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सव आयोजित करण्यात आल्याचीमाहिती जिल्हा व महिला अतुल भडांगे यांनी दिली. या बाल महोत्सवांमध्ये वेगवेगळे प्रकारचे क्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्यात आले असून कबड्डी, रनिंग, डिश, भालाफेक सांस्कृतिक कार्यक्रम तसेच अन्य कार्यक्रमाची मेजवानी या महोत्सवामध्ये दिसणार आहे. हा बाल क्रीडा महोत्सव बीएड कॉलेजच्या ग्राउंडवर होणार आहे, अशी माहिती जिल्हा संरक्षण अधिकारी अजय डबले यांनी दिली.




# महानगर पालिका विजयाचा महासंग्राम.....



# सत्याचा नेहमी विजय होतो - सचिन भेंडे

## आमदार रवी राणा यांचा प्रतिष्ठेचा उमेदवार विजयी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीत साईनगर प्रभागातून युवा स्वाभिमान संघटनेचे उमेदवार सचिन भेंडे यांनी दणदणीत विजय मिळवून राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे. भाजपचे उमेदवार तुषार भारतीय यांचा तब्बल ४ हजार मतांनी पराभव करत सचिन भेंडे विजयी झाले. हा सामना अत्यंत प्रतिष्ठेचा मानला जात होता, कारण आमदार रवी राणा यांनी या प्रभागात संपूर्ण ताकद, यंत्रणा आणि राजकीय वजन पणाला लावले होते.निवडणूक प्रचाराच्या काळात साईनगर प्रभागात जोरदार वातावरण निर्माण झाले होते. प्रचार रॅल्या,



बैठका, पदाधिकाऱ्यांची फळी आणि थेट संपर्क मोहिमेद्वारे दोन्ही बाजूंनी मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, स्थानिक प्रश्न, विकासकामांची गती आणि थेट जनसंपर्क याचा फायदा युवा स्वाभिमान संघटनेच्या उमेदवाराला झाल्याचे निकालातून स्पष्ट झाले.विजयानंतर माध्यमांशी बोलताना सचिन भेंडे यांनी भावना व्यक्त करताना सांगितले, सत्याचा नेहमी विजय होत असतो. हा विजय माझा वैयक्तिक नसून साईनगर प्रभागातील सर्व मतदारांचा आहे. जनतेने माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्याला मी कधीही तडा जाऊ देणार नाही. त्यांनी सर्व समर्थक, कार्यकर्ते आणि मतदारांचे आभार मानले.भाजपचे उमेदवार तुषार भारतीय हे भाजप आमदार श्रीकांत भारतीय यांचे लहान बंधू असूनही त्यांना पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे हा निकाल भाजपसाठी धक्कादायक मानला जात आहे. दुसरीकडे, आमदार रवी राणा यांचा हा विजय राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा ठरला असून, त्यांच्या प्रभावाखालील उमेदवाराने साईनगर प्रभागात वर्चस्व सिद्ध केल्याचे चित्र आहे.सचिन भेंडे यांनी पुढे बोलताना सांगितले की, प्रभागातील पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, शिक्षण व युवकांसाठी संधी निर्माण करणे हे माझे प्राधान्य असेल. निवडणुकीत दिलेल्या प्रत्येक शब्दाची पूर्तता करण्यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे.या निकालामुळे अमरावती महानगरपालिकेच्या राजकारणात नवे समीकरण तयार होत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. युवा स्वाभिमान संघटनेचा हा विजय कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढवणारा ठरला असून, आगामी काळात महापालिकेतील राजकारण अधिक रंगतदार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# विलास इंगोले यांच्या विजयानंतर माजी मंत्री यशोमती ठाकुर यांचे औक्षण; अभिनंदनाचा वर्षाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावती महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार विलास इंगोले यांनी दणदणीत विजय मिळवल्यानंतर माजी मंत्री तथा काँग्रेस नेत्या मा. यशोमती ठाकुर यांनी त्यांचे औक्षण करून अभिनंदन केले. विजयाची अधिकृत घोषणा होताच काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.या प्रसंगी यशोमती ठाकुर यांनी विलास इंगोले यांच्या विजयाबद्दल समाधान व्यक्त करत, हा विजय जनतेच्या विश्वासाचा आणि काँग्रेसच्या विचारधारेचा असल्याचे सांगितले. जनतेने विकास, पारदर्शकता आणि



लोकाभिमुख कामाला मत दिले आहे. विलास इंगोले हा विश्वास नक्कीच सार्थ ठरवतील, असे त्या म्हणाल्या.विलास इंगोले यांनीही यावेळी मतदारांचे आभार मानत, प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचे आश्वासन दिले. या विजयामुळे अमरावतीतील काँग्रेस कार्यकर्त्यांचा उत्साह दुणावला असून, आगामी काळात महापालिकेतील भूमिका अधिक सक्षमपणे मांडण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# देवेंद्र फडणवीसांचे मामेभाऊ विवेक कलोती यांचा पराभव

## अमरावतीत भाजपाला मोठा धक्का

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावती महापालिका निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ विवेक कलोती यांचा पराभव झाला आहे. अटीतटीच्या लढाईत काँग्रेसचे उमेदवार संजय शिरभाते यांनी कलोती यांना पराभूत केले आहे. बडनेरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षामुळेच फडणवीस यांच्या मामेभावाचा पराभव झाला, असा आरोप भाजपाच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी केला आहे. यादरम्यान विवेक कलोती यांच्या पराभवावर भारतीय जनता पक्षाने आपली प्रतिक्रिया दिली आहे.


देवेंद्र फडणवीस यांच्या मामेभावाचा पराभव


अमरावती महापालिकेतील ८७ जागांसाठी गुरुवारी (१४ जानेवारी) शांततेत मतदान पार पडले. या निवडणुकीत भाजपा विरुद्ध काँग्रेस असा चुरशीचा सामना पाहायला मिळणार होता. मात्र, प्रचाराच्या धामधुमीत आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमानी पक्षाने अचानक भाजपाची साथ सोडली. त्यामुळे काँग्रेस व अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील उमेदवारांच्या विजयाच्या आशा पल्लवीत झाल्या. शुक्रवारी सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होताच भाजपा व काँग्रेसने मोठी आघाडी घेतली होती; तर रवी राणा यांच्या पक्षातील उमेदवार पिछाडीवर होते. अमरावतीत भाजपा विरुद्ध काँग्रेस अशी चुरशीची लढत पाहायला मिळत आहे.

# उद्धवजी आणि पेग्विनला; जय श्रीराम

## नितेश राणेंनी उडवली उद्धव ठाकरेंची खिल्ली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६मुंबई**

मुंबई महानगरपालिकेच्या मतमोजणीत महायुतीने (भाजप-शिंदे गट) निर्णायक आघाडी घेतल्यानंतर राजकीय वर्तुळातून जोरदार प्रतिक्रिया उमटत आहेत. भाजपचे आक्रमक नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी या विजयाचा आनंद साजरा करताना शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची थेट खिल्ली उडवली आहे. नितेश राणे यांनी आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरून एक व्हिडीओ शेअर केला असून, त्यात ते ठाकरे गटाच्या पराभवावर हसताना दिसत आहेत.



नितेश राणे यांनी शेअर केलेल्या २२ सेकंदांच्या व्हिडीओमध्ये ते अत्यंत आनंदात दिसत असून ठाकरे गटाच्या स्थितीवर हसत आहेत. उद्धवजी आणि पेग्विनला जय श्रीराम असं म्हणत त्यांनी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. मुंबईत गेल्या अनेक दशकांपासून असलेल्या ठाकरेंच्या सत्तेला यंदा सुरुंग लागल्याचे पाहून राणे यांनी हा 'विक्टरी' मोडमधील व्हिडीओ शेअर केला आहे.

निकालांवर भाष्य करताना नितेश राणे यांनी मंत्र्यांच्या शैलीत विरोधकांचा समाचार घेतला. उद्धव ठाकरे यांनी निवडणुकीच्या दिवशी शाई पुसल्याचे जे रडगाणे गायले होते, त्याला मुंबईकरांनी चोख उत्तर दिले आहे. मुंबईकरांनी काम करणाऱ्या 'महायुती'ला पसंती दिली असून, घरात बसून राजकारण करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे, असे राणे यांनी आपल्या प्रतिक्रियेत म्हटले आहे. ठाकरे बंधू (उद्धव आणि राज ठाकरे) एकत्र येऊनही महायुतीला रोखू शकले नाहीत, याकडे नितेश राणे यांनी लक्ष वेधले. २० वर्षांनंतर दोन भाऊ एकत्र आले तरीही त्यांना १०० चा आकडाही गाठता आला नाही. हेच महायुतीचे यश आणि त्यांच्या नेतृत्वाचे अपयश आहे, अशी बोचरी टीका त्यांनी केली.

# सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल, अमरावती येथे आईने आपली किडनी देऊन वाचविले मुलाचे प्राण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

स्थानिक विभागीय संदर्भ सेवारुग्णालय ( सुपर स्पेशलिटी) हॉस्पिटल अमरावती. येथे ६५ वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आली.सदर रुग्ण हा किडनी आजाराने त्रस्त असल्याने त्यासाठी बाहेर उपचार पद्धती चालू होती व काही वर्षांपासून डायलिसिस करत होता . तेव्हा डॉक्टरांनी रुग्णास व त्याच्या कुटुंबीयास किडनी प्रत्यारोपण विषयी माहिती दिली व विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय ,अमरावती येथे होत असलेल्या यशस्वी व विनामूल्य शस्त्रक्रिया यासाठी रुग्ण विविध जिल्ह्यांमधून नव्हे तर इतर राज्यामधून सुद्धा येत असतात याविषयी महिती दिली. तेव्हा आज रुग्णालयात झालेले ६५ वे किडनी प्रत्यारोपण, हे २९ वर्षीय शेख फारुख शेख सत्तार यांची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे. सदर रुग्ण हा वाशीम येथील रहिवासी असुन मागील काही वर्षापासून डायलिसिस चालु होते मात्र डायलिसिस यावर दीर्घकाळ उपाय नसून व होणारा त्रास बघुन किडनी प्रत्यारोपण हा यावरील योग्य उपाय आहे, असे जेव्हा डॉक्टरांनी सांगितले त्यावेळी मुलाच्या पुढील भविष्याचा विचार करून आई नसीमबानो शेख सत्तार (४७वर्ष )यांनी आपली एक किडनी मुलगा फारुख ला देण्याचा निर्णय घेतला, व आपली एक किडनी फारुख ला देऊन त्याला नवीन जीवन दिले.महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया विनामुल्य करण्यात आली.सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल अमरावती येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नेफरोलॉजिस्ट डॉ. प्रणित काकडे, डॉ. नयन काकडे ,युरो सर्जन डॉ.राहुल पोटोडे, डॉ.विक्रम देशमुख, डॉ. राहुल घुले, डॉ. प्रतिक चिरडे, डॉ विशाल बाहेकर,बधिरिकरण तज्ञ- डॉ. रोहित हातगावकर, डॉ. बाळकृष्ण बागवाले, डॉ. शितल सोळंके , डॉ. परिणिती ,डॉ.विक्रांत कुळमेथे, डॉ.माधव ढोपरे,डॉ. जयश्री पुसदेकर, डॉ.नाहीद, डॉ. रमणीय,डॉ. उज्वल अभ्यंकर, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ. श्रद्धा जाधव,समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) शितल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ.सोनाली चौधरी,महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने मधील एम.सी.ओ.डॉ. पायल रोकडे ,डॉ. दिव्यांनी मुंदाने, आशिष तायडे त्याचप्रमाणे अधीसेविका चंदा खोडके यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर ज्योती तायडे, सरला राऊत, नीता कांडलकर, दिपाली तायवाडे, माधुरी सोनटक्के, , विवेक तायडे, वैष्णवी निकम, कीर्ती तायडे, अक्षय पवार, मयुरी खेरडे,नीलिमा, अनु वडे,योगिश्री पडोळे,वैशाली ढोबळे, शुभांगी टिंगणे ,विशाखा बरवान, अर्चना मढावी, वैष्णवी टाकरखेडे ,आहारतज्ञ कविता देशमुख, रश्मिता दिघडे, श्रीधर ढेंगे,औषध विभागामधील योगेश वाडेकर, अमोल वाडेकर, पंकज बेलुरकर,आशिष थुल, गजानन मातकर, अविनाश राठोड, आशिष मिश्रा, रुपेश हरडे,सुनीता ठाकूर, संगीता, दिपटे, भेंडकर, इंदू पाटील, गजानन चौधरी,प्रशांत थेटे, निलेश आत्राम इत्यादींचे किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेमध्ये विषेश सहकार्य होते.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत